POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र


○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-३२० ● मुंबई, शनिवार, २१ जून २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## खरी शिवसेना कोणाची हे एकनाथ शिंदेंनी दाखवून दिलं
# मुंबईत येऊन अमित शाहंनी ठणकावून सांगितलं



**■मुंबई । प्रतिनिधी :**

खरी शिवसेना कोणाची यावरुन उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्यात आरोप प्रत्यारोप सुरु असतात. अशातच आता यामध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी उडी घेतली आहे. खरी शिवसेना कोणची याचा परिचय एकनाथ शिंदे यांनीच करुन दिल्याचे मत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी करुन दिला आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले तेव्हादेखील डबल इंजिन सरकार होते. त्यानंतर देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री झाले, परत डबल इंजिन सरकार आल्याचे अमित शाह म्हणाले.

महाराष्ट्रातील देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या डबल इंजिन सरकारने मोदीजींच्या नेतृत्वात ७ लाख कोटीहून अधिक गुंतवणूक करुन मुंबईला वाचवण्याचे काम केल्याचे अमित शाह म्हणाले. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चर च्या नवनिर्मित मुख्यालयाच्या इमारतीचे आणि मुंबईत राज्यस्तरीय सहकारी औद्योगिक परिषदेचे उद्घाटन अमित शाह यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. अनेक वर्षापासून महाराष्ट्र औद्योगिक क्षेत्राचं नेतृत्व करत असल्याचे अमित शाह म्हणाले. त्यामुळंच मुंबईनगरीला देशाची आर्थिक राजधानी म्हणले जाते.

### देशातील सगळ्यात मोठी अर्थव्यवस्था महाराष्ट्राची

देशातील सगळ्यात मोठी अर्थव्यवस्था महाराष्ट्राची आहे. एफडीआयमध्ये सगळ्यात जास्त हिस्सा महाराष्ट्रात आहे. सगळ्यात जास्त विदेशी पर्यटक महाराष्ट्रात, सगळ्यात जास्त स्टार्टअप महाराष्ट्रात जास्त असल्याचे अमित शाह म्हणाले. भारताचे सगळ्यात मोठे बंदर वाडवनमध्ये तयार होत आहे. येणाऱ्या काळात मुंबईचे काय होणार याची मला चिंता होती. कारण वाढत लोकसंख्या असेल, वाढती झोपडपट्टी, ट्रॅफिकची समस्या होती. पण मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करेल असे अमित शाह म्हणाले. त्यांनी पहिल्या सरकारच्या कार्यकाळात मुंबईच्या विकासासाठी सात लाख कोटी रुपयांची गुंतवणूक केल्याचे अमित शाह म्हणाले. यावेळी बोलताना अमित शाह यांनी कॉंग्रेसवर देखील टीका केली. किती वर्ष झालं तुमच्याकडे महाराष्ट्र होता. तुम्ही काय केले? मुंबईसाठी तुम्ही काय केले? असा सवाल अमित शाह यांनी केला. देशात विमानतळांची संख्या वाढली आहे. रेल्वे वाढल्या आहेत. मेट्रो झाली आहे असे अमित शाह म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काळात मोठं काम झाल्याचे अमित शाह म्हणाले. औद्योगिक विकासासाठी निधी दिला, त्याचबरोबर जलसिंचनासाठी अनेदान दिल्याचे अमित शाह म्हणाले.

## मुंबई, पुणे, रायगड, सातारा, रत्नागिरीत ऑरेंज अलर्ट
# खडकवासला, गंगापूर धरणातून पाण्याचा विसर्ग




### नाशिकमध्ये दुतोंड्या मारुतीच्या पायाजवळ पाणी

नाशिकमध्ये जोरदार पाऊस झाल्यामुळे गंगापूर धरणातून सकाळी ५३० क्युसेक पाण्याचा विसर्ग करण्यात आला. दारणा धरणातून ४७४२ क्यूसेक पाण्याचा विसर्ग करण्यात आला. गोदाघाट परिसरातील रहिवाशांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. नाशिकच्या दुतोंड्या मारुतीच्या पायाजवळ पाणी आले. मध्यरात्रीपासून नाशिकमध्ये पावसाने विश्रांती घेतली आहे. परंतु धरणातून पाण्याचा विसर्ग होणार असल्याने गोदाघाट परिसरात पुन्हा अलर्ट दिला आहे.

**■मुंबई । प्रतिनिधी :**

राज्यात पावसाचा जोर कायम राहणार आहे. कोकण, पुणे, मुंबईसह मध्य महाराष्ट्रात अतिवृष्टीचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. राज्यात २५ जूनपर्यंत पाऊस असणार आहे, असा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. पुणे जिल्ह्यातील घाट विभागात पावसाचा अधिक जोर असणार आहे. या भागात मुसळधार पावसाने २४ तासांसाठी ऑरेंज अलर्ट दिला आहे. मुंबई, पुणे, रायगड, सातारा, रत्नागिरीत ऑरेंज अलर्ट दिला आहे.

पुणे जिल्ह्यातील घाट विभागात पावसावर वाढला आहे. गेल्या २४ तासांत तामिनी घाट परिसरात हंगामातील सर्वाधिक तब्बल २३० मीटर पावसाची नोंद झाली. लोणावळा, शिरगाव, वळवण, अंबावणे, खोपोली, खंद परिसरात १५० ते २०० मिमीपेक्षा अधिक पावसाची नोंद झाली आहे. पुण्यातील घाट विभागात पुढील दोन दिवस मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. त्यामुळे ऑरेंज देण्यात आला असून पर्यटकांनी काळजी घ्यावी असे आवाहन करण्यात येत आहे.

### खडकवासलातून विसर्ग वाढवला

पुणे येथील खडकवासला धरणातून रात्री उशिरा विसर्ग वाढविला आहे. धरण परिसरात जोरदार पाऊस झाल्याने १.७१ टीएमसीने पाणी वाढले आहे. खडकवासला, टेमघर, वरसगाव आणि पानशेत या चार धरणांच्या पाणलोट परिसरात मागील २४ तासांत जोरदार पाऊस झाल्याने धरणांचा पाणी पातळी झपाट्याने वाढ होत आहे. खडकवासला धरण 84 टक्के भरल्याने खबरदारीचा उपाय म्हणून धरणातून पाणी सोडण्यात सुरुवात झाली. रात्री ११ वाजता १५,००० हजार क्यूसेक्सने विसर्ग सुरु करण्यात आला.

### आंबेनळी घाटाबाबत महत्वाचा निर्णय

सातारा जिल्ह्यात मागील दोन दिवसांपासून पश्चिम भागातील घाटमाथ्यावर मोठ्या प्रमाणात पाऊस पडत आहे. यामुळे सातारा आणि रायगड जिल्हा प्रशासनाच्या वतीने महाबळेश्वर ते पोलादपूर जोडणारा आंबेनळी घाट संध्याकाळी सात वाजल्यापासून सकाळी सात वाजेपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. मागील दोन दिवसांपासून महाबळेश्वरपासून पोलादपूर घाटात रायगड हद्दीत दरडी कोसळण्याचे प्रमाण वाढले आहे. यामुळे आणि धुक्याचे प्रमाणही वाढल्याने प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी पत्रकारद्वारे दिली आहे.

# जालन्यात ४० कोटींचा अतिवृष्टी अनुदान घोटाळा
## आणखी ७ तलाठी, ५ तहसील क्लार्कची उचलबांगडी, आतापर्यंत १७ तलाठी निलंबित

**■जालना । प्रतिनिधी :**

जालना जिल्ह्यातील ४० कोटींच्या अतिवृष्टी अनुदान घोटाळा प्रकरणाची व्याप्ती वाढतच चालली आहे. शुक्रवारी (२० जून) पुन्हा या प्रकरणी ७ तलाठी आणि ५ तहसील क्लार्कचे निलंबन करण्यात आलं आहे. या घोटाळ्यात ५ तहसीलदार आणि नायब तहसीलदारांचा देखील समावेश आढळून आला आहे. त्यांचे देखील खुलासे मागवण्यात आले आहेत. दरम्यान आजच्या कारवाईनंतर या प्रकरणात आत्तापर्यंत १७ तलाठी आणि पाच तहसील कर्मचाऱ्यांचे निलंबन करण्यात आलं आहे. जालना जिल्हाधिकारी डॉक्टर श्रीकृष्णनाथ पांचाळ यांनी ही कारवाई केली असून या प्रकरणात आणखी ३५ तलाठ्यांची




विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

**जालन्याच्या अंबड आणि घनसावंगी तालुक्यात तहसीलदारांचे लॉगिन, पासवर्डचा गैरवापर करून तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहायकांनी अतिवृष्टी आणि गारपिटचे अनुदान हडप केल्याचा प्रकार समोर आला होता. या प्रकरणाच्या चौकशीसाठी ८ सदस्यीय समिती नेमण्यात आली होती.**

### अनुदान हडप केल्याचा प्रकार उजेडात

जिल्हाधिकाऱ्यांनी नेमलेल्या चौकशी मध्ये २०२२ ते २०२४ या कालावधीत बोगस शेतकरी दाखवून एकाच नावावर दुबार अनुदान उकळलं गेलं, तर जमीन नसताना देखील अनुदान हडप केल्याचा प्रकार उजेडात आला आहे. या कारवाईनंतर याचे धागेदोरे तहालीदारांपर्यंत पोहचले आल्याचे दिसत असून याप्रकरणी शासन स्तरावरून फौजदारी गुन्हे दाखल होण्याची शक्यता आहे. दरम्यान, या सर्व प्रकरणाविषयी जालना जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण नाथ पांचाळ यांनी माहिती दिली.

जालना जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण नाथ पांचाळ यांनी माहिती दिलेल्या माहितीनुसार जालन्यातील ४० कोटींच्या अतिवृष्टी अनुदान घोटाळ्यात आणखी ७ तलाठी आणि ५ तहसील क्लार्कचे निलंबन करण्यात आलं आहे. आणखी ३५ तलाठ्यांविरोधात विभागीय चौकशी प्रस्तावित आहे. चौकशी अहवालामध्ये ५ तहसीलदारांवर कारवाईची शिफारस करण्यात आली असून त्यांचे खुलासे मागवले आहेत. या प्रकरणात यापूर्वी १० तलाठ्यांचे निलंबन करण्यात आलं आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी नेमलेल्या चौकशी समितीमध्ये तत्कालिन आणि कार्यरत तहसीलदारांवर देखील ठपका ठेवण्यात आला आहे. या प्रकरणात फौजदारी गुन्हे दाखल होण्याची शक्यता आहे.

### प्रवाशांची व्यवस्था

या घटनेमुळे पुण्यात जे प्रवासी अडकले आहेत, त्यांच्या राहाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे, सोबतच त्यांना इतर सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या प्रवाशांना कॅन्सिलेशन किंवा पर्याय म्हणून रिशेड्यूलिंगची सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच या प्रवाशांना दिल्लीला नेण्यासाठी पयार्यी व्यवस्था करण्यात येत असल्याची माहिती देखील एअर इंडियाच्या वतीनं देण्यात आली आहे. दरम्यान काही दिवसांपूर्वी अहमदाबादमध्ये भीषण विमान अपघात घडला होता. लंडनला जाण्यासाठी अहमदाबादवरून विमानानं उड्डाण केलं, मात्र अवघ्या काही सेकंदांमध्ये या विमानाचा भीषण अपघात घडला. हे विमान मेडीकल कॉलेजच्या इमारतीवर कोसळलं, या विमान अपघातामध्ये शेकडो लोकांचा मृत्यू झाला. या विमानात असलेला केवळ एक प्रवाशी वाचला होता. दरम्यान त्यानंतर आता हा अपघात नेमका कसा झाला, याच्या कारणांचा शोध सुरू आहे. यादरम्यान अनेक धक्कादायक खुलासे समोर येत आहेत.

# आणखी एक मोठा विमान अपघात टळला
## एअर इंडियाच्या विमानासोबत नेमकं काय घडलं?



आणखी एका विमानाचा मोठा अपघात टळला आहे. दिल्लीहून पुण्याला जाणाऱ्या एअर इंडियाच्या विमानाला शुक्रवारी पक्ष्यानं धडक दिली. त्यानंतर या विमानाची रिटर्न ट्रीप रद्द करण्यात आली आहे. याबाबत माहिती देताना एअरलाइन्सच्या वतीनं सांगण्यात आलं की, हे विमान सुरक्षितरित्या खाली उतरवण्यात आलं आहे. विमान दिल्लीहून पुण्याला निघालं होतं, याचदरम्यान पक्ष्यानं विमानाला धडक दिली. जेव्हा या विमानाचं आगमन पुण्यात झालं, तेव्हा याबाबत माहिती मिळाल्याचं एअरलाइन्सनं म्हटलं आहे.

या घटनेबाबत माहिती देताना एअर इंडियानं म्हटलं आहे की, सध्या हे विमान पुणे विमानतळावरच आहे. या विमानाची रिटर्न ट्रीप रद्द करण्यात आली असून, सध्या इंजिनियरचं एक पथक या विमानाची सर्व बाजुनं तपासणी करत आहे. या विमानानं दिल्लीहून पुण्यासाठी उड्डाण केलं होतं, याच दरम्यान ही घटना घडली. जेव्हा हे विमान पुण्यात आलं तेव्हा, याबाबत माहिती मिळाली, त्यामुळे आता पुण्याहून दिल्लीला जाणारी फेरी रद्द करण्यात आली आहे.

# मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क विभागाची मोठी कारवाई
## थायलंडमधून आणलेला २५ कोटींचा गांजा जप्त



### पर्यटनाच्या नावाखाली गांजा तस्करी

दक्षिण अमेरिका खंडातील देशांमध्ये मोठ्या प्रमाणात गांजाची निर्मिती करण्यात येते. त्यानंतर विविध मार्गांनी त्याचे जगभरात वितरण करण्यात येते. गेल्या काही महिन्यांपासून बँकॉकमार्गे मोठ्या प्रमाणात गांजाची तस्करी केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. भारतातून थायलंडमध्ये मोठ्या प्रमाणात पर्यटकांचे जाणे - येणे असते. त्यामुळे या मार्गावर मोठ्या प्रमाणात विमानांची ये-जा असते. परिणामी, बँकॉकमार्गे भारतात गांजाची तस्करी करण्यात येत आहे. गेल्या सहा महिन्यांत १०० कोटींहून अधिक किमतीचा गांजा जप्त करण्यात आला आहे. या तस्करीत थायलंडमधील भारतीय तस्करांचा सहभाग असल्याची प्राथमिक माहिती आहे.

**■मुंबई । प्रतिनिधी :**

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर मुंबई सीमाशुल्क विभाग परिमंडळ - ३ च्या अधिकाऱ्यांनी अमली पदार्थ तस्करीविरोधात मोठे यश मिळवले असून, या कारवाईत थायलंडहून तस्करी करून आणलेला २४ किलो ९६ ग्रॅम हायड्रोपोनिक गांजा जप्त करण्यात आला. या गांजाची किंमत सुमारे २४ कोटी ६६ लाख रुपये असून या प्रकरणी दोन प्रवासी आणि त्यांच्याकडून गांजा स्वीकारणारा व्यक्ती अशा तिघांना अटक करण्यात आली आहे. बँकॉकहून काही संशयीत व्यक्ती मोठ्या प्रमाणात गांजा घेऊन येत असल्याची माहिती सीमाशुल्क विभागाला मिळाली होती. मिळालेल्या माहितीनुसार, बँकॉकहून बुधवारी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर आलेल्या दोन प्रवाशांना सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी थांबवले आणि त्यांच्या सामानाची तपासणी केली. त्यांच्या सामानात व्हॅक्युम-पॅक पद्धतीने लपवून ठेवलेला हिरव्या रंगाची पाने सापडली. तपासणीत तो उच्च प्रतीचा हायड्रोपोनिक गांजा असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर तात्काळ राबविण्यात आलेल्या संयुक्त कारवाईमध्ये तस्करी केलेला गांजा स्वीकारण्यासाठी आलेल्या एका व्यक्तीला ताब्यात घेण्यात आले. अटक करण्यात आलेल्या तिघांवर अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्याअंतर्गत अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राथमिक तपासातून हे प्रकरण आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ तस्करांच्या टोळीशी संबंधित असल्याचे निष्पन्न झाले. त्यांची माहिती सीमाशुल्क अधिकाऱ्याना मिळाली आहेत. मोबाइलमधील संभाषण व संदेशांद्वारे आरोपींची नावे सीमाशुल्क अधिकाऱ्यांना मिळाली आहेत. त्यात परदेशी नागरिकांचाही समावेश आहे. या संपूर्ण टोळीशी संबंधित आरोपींचा शोध सुरू असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

# रेनकोट पडल्याचा भास, पण संध्याने उडी मारलेली
## साठ्ये कॉलेजच्या विद्यार्थिनीबाबत सीसीटीव्हीमध्ये काय काय दिसलं?

**■मुंबई । प्रतिनिधी :**

विलेपार्ले येथील साठ्ये कॉलेजमध्ये गुरुवारी एका विद्यार्थिनीने तिसऱ्या मजल्यावरून उडी मारुन आत्महत्या केली. संध्या पाठक, वय २१ वर्ष, असे या विद्यार्थिनीचे नाव आहे. उडी मारण्यापूर्वी संध्याने दहा मिनिटे या ठिकाणाची पाहणी केल्याचे सीसीटीव्हीमध्ये दिसते. तिने उडी मारली, त्यावेळी रेनकोट पडला असावा, असा भास काही जणांना झाल्याची माहितीही सूत्रांनी दिली आहे. तिच्या बॅगेत काही औषधे सापडल्याचीही माहिती आहे. संध्या ही साठ्ये कॉलेजमध्ये तिसऱ्या वर्षात शिकत होती. गुरुवारी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांची गर्दी कमी असताना, तिने तिसऱ्या मजल्यावरून उडी मारली. काहीतरी पडल्याचा आवाज आल्याने सर्वजण जमा झाले. संध्याला रक्ताच्या थारोळ्यात पाहून खळबळ उडाली. माहिती मिळताच विलेपार्ले पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तिला तात्काळ जवळच्या




रुग्णालयात नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. संध्या हिने आत्महत्या केल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. संध्या हिच्या पालकांनी मात्र तिच्या मृत्यूबाबत संशय व्यक्त केला आहे. दरम्यान, साठ्ये कॉलेजने पोलिसांना पूर्ण सहकार्य करत असल्याचे म्हटले आहे. घटनेनंतर विद्यार्थिनीच्या पालकांशी संपर्क साधून त्यांना तातडीने बोलावून घेतले. या घटनेचा तपास विलेपार्ले पोलिस ठाण्यातील पोलिस करत असून त्यांना आवश्यक ती सर्व माहिती पुरविण्यात येत असल्याचे कॉलेजने म्हटले आहे.

१९ जून २०२५ रोजी सकाळी ७ वाजून १५ मिनिटांच्या सुमारास साठ्ये महाविद्यालयात बीएससी स्टॅटिस्टिक्स अभ्यासक्रमाच्या तिसऱ्या वर्षाला शिकत असलेली विद्यार्थिनी कुमारी संध्या पाठक ही महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराशेजारी रक्ताच्या थारोळ्यात पडलेली महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना आढळली. आवाज झाल्याने महाविद्यालयात उपस्थित कर्मचारी आणि दोन विद्यार्थी घटनास्थळी मदतीसाठी धावत गेले आणि सदर विद्यार्थिनीला महाविद्यालयाच्या नजिक असणाऱ्या गावडे हॉस्पिटलमध्ये तातडीच्या वैद्यकीय उपचारांसाठी तात्काळ दाखल केले. तिथे उपचाराच्या दरम्यान हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. महाविद्यालयाने विद्यार्थिनीच्या पालकांशी त्वरीत संपर्क साधून बोलवून घेतले. या घटने संदर्भात विलेपार्ले पोलीस अधिक तपास करत असून महाविद्यालय विलेपार्ले पोलीस विभागास सर्वतोपरी मदत करत आहे, असे निवेदन कॉलेजने जारी केले आहे.

# मुक्त विद्यापीठातर्फे एमबीए, एमसीए, बीसीए व बी. एस्सी. डाटा सायन्स
## शिक्षणक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता प्रवेश परीक्षा देणे आवश्यक

**■नाशिक । प्रतिनिधी :**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे नवीन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता एमबीए, एमसीए, बीसीए व बी. एस्सी. डाटा सायन्स या शिक्षणक्रमांची प्रथम वर्षासाठी ऑनलाईन प्रवेशप्रक्रिया सुरु झाली आहे. त्यानुसार या सर्व शिक्षणक्रमांच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी संबंधित प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. एमबीए प्रवेशासाठी दिनांक १९ जुलै २०२५ तर एमसीए, बीसीए व बी. एस्सी. डाटा सायन्स या शिक्षणक्रमांसाठी दिनांक १३ जुलै २०२५ ही अंतिम मुदत आहे, अशी माहिती विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील यांनी दिली आहे.

एमबीए शिक्षणक्रमासाठीचे ऑनलाइन प्रवेश २० जून २०२५ पासून सुरू झाले आहेत. त्याची प्रवेश परीक्षा नोंदणी दिनांक १९ जुलै २०२५ पर्यंत उपलब्ध असेल. प्रवेश परीक्षा ही दिनांक २० जून २०२५ ते २१ जुलै २०२५ पर्यंत ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येईल. ही परीक्षा १०० गुणांची असून, प्रत्येक प्रश्नाला २ गुण असतील आणि नकारात्मक गुणांकन (निगेटीव्ह मार्किंग) पद्धत लागू राहणार नाही. एकूण ६० पैकी ५० प्रश्न सोडवणे



आवश्यक आहे. परीक्षेचा कालावधी जास्तीत जास्त ६० मिनिटे असेल. प्रवेश परीक्षा शुल्क रु. ६००/- असून, अनुत्तीर्ण झाल्यास पुन्हा रु. ६००/- शुल्क भरून परीक्षा देता येईल. एमसीए, बीसीए व बी. एस्सी. डाटा सायन्स या शिक्षणक्रमांसाठीचे प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाइन नोंदणी दिनांक १३ जुलै २०२५ पर्यंत २४ तास उपलब्ध असेल. प्रवेश परीक्षा ही दिनांक १७ जुलै २०२५ पर्यंत ऑनलाइन पद्धतीने घेतली जाईल. एकूण १०० गुणांसाठी प्रत्येकी दोन गुणांचे ५० प्रश्न विचारले जातील आणि सर्व ५० प्रश्न सोडवणे आवश्यक आहे. परीक्षेचा कालावधी जास्तीत जास्त ५० मिनिटे असेल. प्रवेशास पात्र होण्यासाठी किमान ४० किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळवणे आवश्यक आहे. प्रवेश परीक्षा शुल्क रु. ५००/- असून, तीन प्रयत्नात अनुत्तीर्ण झाल्यास पुन्हा रु. ५००/- शुल्क भरून परीक्षा देता येईल. नोंदणीसाठी https://ycmapp.ycmou.org.in/login या लिंकचा वापर करावा.

उमेदवारांनी नोंदणी करण्यापूर्वी संबंधित माहितीपुस्तिकेमध्ये नमूद केलेली शिक्षणक्रमाची पात्रता असल्याची खात्री करूनच नोंदणी करावी, नोंदणी केल्यानंतर उमेदवारास सराव परीक्षा उपलब्ध करून देण्यात येईल. त्यानंतरच प्रवेश परीक्षा देता येईल. प्रवेश घेताना इतर शैक्षणिक कागदपत्रांसह प्रवेश परीक्षेत पात्र असल्याबाबतचे प्रमाणपत्र अपलोड करणे आवश्यक राहील. परीक्षेसंदर्भात काही तांत्रिक अडचण आल्यास हेल्पलाईन क्रमांक ८०५५२५३०७२, ७४४७४५७१९४ वर संपर्क साधावा. देयका (पेमेंट) संदर्भात ycmou_support@unisuite.in या ईमेल आयडीवर संपर्क करावा. अधिक माहितीसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळाला www.ycmou.ac.in किंवा https://ycmou.digitaluniversity.ac भेट द्यावी, वरील दोन्ही प्रवेश परीक्षेसाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव श्री. दिलीप भरड यांनी केले आहे.

# कोल्हापुरात पुरुष आणि महिलेकडून स्मशानभूमीत नग्न पूजा

### भरदिवसा नग्न होवून अघोरी पूजा

उदगाव ग्रामपंचायतीने सीसीटीव्हीची तपासणी केली असता या सीसीटीव्हीमध्ये महिला, पुरुष वेगवेगळ्यावेळी विशेषतः अमावस्या, पौर्णिमा, शनिवार, बुधवार अशा दिवशी भरदिवसा नग्न होवून अघोरी पूजा करीत असल्याचे समोर आले आहे. सातत्याने होत असलेल्या या करनी भानामतीच्या प्रकारामुळे उदगाव, जयसिंगपूरमध्ये खळबळ उडाली आहे. हे अंधश्रद्धेचे प्रकार उघड झाल्याने ग्रामपंचायतीने कडक पाऊस उचलण्याची गरज असल्याचे म्हटले जात आहे.त्यामुळे वैकुंठधामाची जबाबदारी घेऊन सुरक्षा रक्षक तैनात करण्याची मागणी होत आहे.



**■बीड । प्रतिनिधी :**

पुरोगामी वारसा असलेल्या कोल्हापूरात आता एका स्मशानभूमीत भानामतीचा भयंकर प्रकार उघडकीस आला आहे. येथील एका ग्रामपंचायतीच्या स्मशानभूमीत एका पुरुष आणि महिलेने नग्न होऊन अघोरी पूजा केल्याचे सीसीटीव्हीतून उघड झाले आहे.यावेळी चितेच्या राखेखाली बाहुली, नारळ ठेवतं भानामतीचा भयंकर प्रकार केल्याचे उघडकीस आल्याचा सीसीटीव्ही व्हायरल झाला आहे. कोल्हापूरातील जयसिंगपूरमधील उदगाव वैकुंठधाम स्मानभूमीतील हा भयंकर प्रकार समोर आला आहे. जयसिंगपूर येथील एका वृद्धाचा मृत्यू झाल्यानंतर उदगाव वैकुंठधाम या ठिकाणी अंत्यसंस्कार करण्यात आले होते. रक्षा विसर्जनाच्या दिवशी सर्व नातेवाईक वैकुंठधाम या ठिकाणी आले. तेव्हा मात्र अंत्यसंस्कार केलेल्या ठिकाणी रक्षा बाजूला करून काळी बाहुली, नारळ, नावाची चिठ्ठी लिहून भानामतीचा प्रकार केला असल्याचा उघड झाल्याने नातेवाईकांमध्ये खळबळ उडाली. त्यानंतर ग्रामपंचायतीने सीसीटीव्हीची तपासणी केली असता खतरनाक प्रकार उघडकीस आला.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# भस्म लावून घेण्यापेक्षा

काळ्या अन् पिवळ्या हळदीला चोळत सुरू असलेला मंत्रांचा जप... केस मोकळे सोडून तोंडात पुटपुटत असलेला काळे वस्त्रधारी बाबा आणि त्याच्या समोर अर्धनग्न अवस्थेत लुंगी गुंडाळून बसलेले शिवसेनेचे रायगडचे आमदार आणि राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले. असे विदारक दृष्य दाखवणारा एक व्हिडीओ दोन दिवसांपासून सोशल मीडियावर व्हायरल होतोय. महायुतीचा घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट)चे प्रवक्ते सूरज चव्हाण यांनी हा व्हिडीओ सार्वजनिक केलाय. या व्हिडीओत भरत गोगावले एका बंगाली बाबाकरवी अघोरी पूजा घालताना दिसत असल्याचा सूरज चव्हाण यांचा दावा आहे. नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या एक महिना आधी विजय सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने ही अघोरी पूजा करण्यात आल्याचे सूरज चव्हाण यांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे याआधी शिवसेनेचे (उद्धव ठाकरे गट) पुण्यातील पदाधिकारी वसंत मोरे यांनीही गोगावलेंचा असाच एक व्हिडीओ सार्वजनिक केला होता. स्वाभाविकच भरत गोगावले यांनी अघोरी पूजेचे दावे फेटाळून लावलेत. माझ्या घरी अनेक संत आणि ऋषी येतात, हा व्हिडीओ त्या काळातील असून माझ्यावरील आरोप पूर्णपणे राजकीयदृष्ट्या प्रेरित असल्याचे गोगावलेंनी म्हटलेय. भाजपचे मंत्री नितेश राणे यांनीही या वादात उडी घेतली. मातोश्रीच्या तिसऱ्या मजल्यावर जा आणि अघोरी पूजा म्हणजे काय ते विचारा. उद्धव ठाकरे स्वतः यात तज्ञ आहेत, असे म्हणत नितेश राणे अपेक्षेनुसार उद्धव ठाकरेंवर घसरले. दुसरीकडे, अंधश्रद्धा निर्मूलन संघर्ष समितीने या व्हायरल व्हिडीओची चौकशी करून ही पूजा खरोखर अघोरी होती की नाही याचा खुलासा करण्याची मागणी केलीय. आता हा प्रकार केवळ महायुतीच्या नेत्यांमधील राजकीय वाद राहिलेला नसून सामाजिक मुद्दाही बनलाय. राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाल्यापासून म्हणजे मागच्या ६ महिन्यांपासून रायगड जिल्ह्याचे पालकमंत्रीपद मिळवण्यासाठी शिवसेना-राष्ट्रवादीत जुंपलेली आहे. याआधीच्या महायुती सरकारमध्येही भरत गोगावलेंची मंत्रीपदाअभावी तडफड झाली होती. यावेळी मंत्रीपद मिळाले खरे पण जिल्ह्यासाठी सर्वात अर्थपूर्ण असलेले पालकमंत्रीपद गोगावलेंना अजूनही हुलकावणीच देत आहे. रायगड जिल्ह्यात शिवसेनेचे सर्वाधिक ३ आमदार आहेत. असे असूनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी रायगडच्या पालकमंत्रीपदाचे मानाचे पान अदिती तटकरेंच्या पुढ्यात ठेवले होते. परंतु गोगावलेंसह शिवसेनेच्या सर्वच मंत्री, आमदारांनी यावरुन आकांडतांडव करताच मुख्यमंत्र्यांना आपला हात आखडता घ्यावा लागला. तेव्हापासून रायगडात सेना-राष्ट्रवादीच्या नेत्यांमध्ये उघड संघर्ष सुरू आहे. काही दिवसांपूर्वीच राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी भर स्टेजवर गोगावलेंची नक्कल केली होती. तर, भरत गोगावलेंनीही त्यांना त्याच भाषेत उत्तर दिल्याने रायगडात राष्ट्रवादी-सेनेतील वाद आणखी उफाळून आला होता. राष्ट्रवादीच्या सूरज चव्हाण यांनी गोगावलेंची अंदर की बात सार्वजनिक करणे हा याच सुप्त-तप्त संघर्षातला प्रकार. काही दिवसांनी तटकरे किंवा राष्ट्रवादीतील आणखी कुणा नेत्याचा असाच एखादा व्हिडीओ बाहेर आल्यास नवल वाटायला नको, कारण सारे एकाच माळेतील मणी. राजकारणात ज्योतिष, पूजा, ग्रह-तारे, खडे-अंगठ्या, बाबाबुवा, तंत्र-मंत्र हे प्रकार काही नवीन नाहीत. १९८०-९० च्या दशकात म्हणजेच भारतीय राजकारणातल्या अनिश्चततेच्या काळात तांत्रिक जगदाचार्य चंद्रास्वामी नावाच्या राजकीय सल्लागाराने प्रसिद्धीचे टोक गाठले होते. दिवंगत पंतप्रधान पी.व्ही. नरसिंह राव, चंद्रशेखर, व्ही.पी.सिंग चंद्रास्वामींच्या चालींनीच राजकारणात पुढचे पाऊल टाकायचे. अनेक भारतीय राजकारण्यांसह अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन, इंग्लंडच्या पंतप्रधान मार्गारेट थॅचर, ब्रुनेईचे राजे, बहरीनचे शेख सलमान अल खलीफा, इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष होस्नी मुबारक, पॅलेस्टाईनचे प्रमुख यासर अराफत, अभिनेत्री एलिझाबेथ टेलर आदी आंतरराष्ट्रीय राजकारणी आणि सेलिब्रिटीही चंद्रास्वामींचे चेले होते, असे म्हणतात. पुढे या राजकीय अनिश्चिततेच्या पुरातच चंद्रास्वामींना गटांगळ्या खाव्या लागल्या तो विषय अलाहिदा. काही वर्षांपूर्वी लालू प्रसाद यादव यांना पंडित शंकर त्रिपाठी नावाच्या ज्योतिषाला राजदच्या प्रवक्तेपदी नेमल्यावरुन बरीच टीका सहन करावी लागली होती. उत्तरेकडच्या राज्यांमध्ये असले प्रकार नवीन नाहीत. तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांचे ज्योतिषशास्त्रावरील प्रेम लपून राहिलेले नाही. परंतु मागच्या काही वर्षांत पुरोगामी महाराष्ट्रालाही अंधश्रद्धेच्या वाळवीने पोखरून काढलेय. व्यासपीठावर फुले, शाहू, आंबेडकरांचे नाव घ्यायचे अन् घरात मंत्र-तंत्राचा जाप करणाऱ्या नेत्यांची महाराष्ट्रात संख्या कमालीची वाढलीय. किंबहुना याच जोरावर आपली राजकीय महत्त्वाकांक्षा सिद्धीस जाईल, अशी त्यांची धारणा झालीय. म्हणूनच तर ज्या राज्याने देशाला सामाजिक सुधारणेचे धडे दिले, त्याच राज्यातील अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याची भीडभाड न बाळगता राजकीय नेते बाबाबुवांच्या वळचणीला जाऊन बसलेले दिसतात. कधी कामाख्या देवीचे नवस फेडण्यासाठी महाराष्ट्रातील मंत्र्यांची ट्रीप गुवाहाटीला जाते, तर कधी मुख्यमंत्रीपद वाचवण्यासाठी इशानेश्वर मंदिरात मंत्र-तंत्राचा आसरा घेतला जातो. मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान असलेल्या वर्षा बंगल्याच्या मागच्या दारात अमूक-तमूक प्राण्यांची हाडे पुरून ठेवल्याच्या अफवाही याच राज्यात चवीचवीने चघळल्या जातात. जसा राजा, तशी त्याची अनुकरणीय प्रजा. या नेत्यांनी अघोरी बाबांकडून कपाळावर भस्म लावून घेण्यापेक्षा राज्यातील जनतेच्या प्रश्नांकडे डोळे उघडे ठेवून काम करावे. त्यामुळे त्यांची राजकारणातली वाटचाल अधिक सोपी होईल.

# युद्धग्रस्त, शापित अन् अस्वस्थ पश्चिम आशिया



बॉम्ब वर्षाव, मृत्यूचे तांडव, भयाची दहशत, क्रूरतेची छाया अशा अत्यंत भयावह स्थितीत असलेला पश्चिम आशिया आणखीनच अस्वस्थ झाला आहे. पश्चिम आशियाने यापूर्वी अरब-इस्त्रायल हा संघर्ष पाहिला आहे. यामुळे तिसरे महायुद्ध पेटते की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली होती. आता पुन्हा अशाच प्रकारचे वातावरण तयार होते की काय, अशी शंका निर्माण झाली आहे.

बॉम्ब वर्षाव, मृत्यूचे तांडव, भयाची दहशत, क्रूरतेची छाया अशा अत्यंत भयावह स्थितीत असलेला पश्चिम आशिया आणखीनच अस्वस्थ झाला आहे. पश्चिम आशियाने यापूर्वी अरब-इस्त्रायल हा संघर्ष पाहिला आहे. यामुळे तिसरे महायुद्ध पेटते की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली होती. आता पुन्हा अशाच प्रकारचे वातावरण तयार होते की काय, अशी शंका निर्माण झाली आहे. इस्त्रायलच्या गाझावरील हल्ल्यांनी माणुसकीला पार काळीमा फासला आहे. त्यात आता इस्त्रायलने इराणवर हल्ले चढविले आहेत. हे सारे 'विनाशकाले विपरीत बुद्धी' असेच आहे.

अन्नाची पाकिटे घेण्यासाठी जीवाच्या आकांताने धावणारे चिमुकले, वृद्ध, महिला अशा साऱ्यांवरच धाडकन बॉम्ब पडतो... कानठळ्या बसवणारा स्फोट होतो... क्षणार्धात सारेच उद्ध्वस्त होते... नियतीच्या दुष्टचक्रामुळे हे सारे घडते आहे का? असा विचार करणाऱ्यांना हे कुठे ठाऊक आहे की, बेंजामिन नेतान्याहूसारख्या क्रूरकर्म्याचा थयथयाट सुरू आहे! युद्धोतिहासात आजवर हिटलरच्या अनेक निष्ठूर कहाण्या सांगितल्या जातात; मात्र, इस्त्रायलचे नेतृत्व करणाऱ्या नेतान्याहू यांनी मानवाधिकारांसह अनेक आंतरराष्ट्रीय नियम आणि कायद्यांचे सर्रास उल्लंघन करीत शस्त्रास्त्रांच्या हल्ल्यांचा सिलसिला कायम ठेवला आहे. विशेष म्हणजे, जगातील १९४ देशांच्या डोळ्यादेखत हे घडते आहे. या सर्व देशातील प्रमुख, नेते, जनता हे सारेच 'हाताची घडी, तोंडावर बोट' ठेवून गपगुमान पाहत आहेत. हे सारे कमी म्हणून की काय आता नेतान्याहू यांनी थेट इराणवर हल्ला चढविला आहे. त्यामुळे जगभरात एकच हलकल्लोळ उडाला आहे.

इस्त्रायल किंवा नेतान्याहू यांच्या मनमानीपणाला मुख्य पाठिंबा आहे तो अमेरिकेचा. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे सत्तारूढ होण्यापूर्वी डांगोरा पिटत होते की, ते शांततेचे पाईक आहेत. रशिया-युक्रेन, इस्त्रायल-गाझा ही युद्धे क्षणार्धात थांबविण्याची वल्गनाही त्यांनी केली. प्रत्यक्षात त्यात त्यांना कुठलेही यश आलेले नाही. याउलट इस्त्रायल-इराण युद्ध सुरू झाल्याने सारेच फासे उलटे पडत आहेत. किंबहुना ट्रम्प यांची तशी इच्छा आहे, असेच म्हणणे योग्य ठरेल. पश्चिम आशियाने यापूर्वी अरब-इस्त्रायल हा संघर्ष पाहिला आहे. यामुळे तिसरे महायुद्ध पेटते की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली होती. सुदैवाने ती निवळली. आता पुन्हा अशाच प्रकारचे वातावरण तयार होते की काय, अशी शंका निर्माण झाली आहे.

जगभरातील ज्यू धर्मीयांनी आपला स्वतंत्र देश अस्तित्वात यावा यासाठी आग्रह धरला. त्यातूनच इस्त्रायलची रक्तरंजित निर्मिती झाली. दुसरे महायुद्ध आणि त्याच्या पश्चात हे सारे घडले. मात्र, मूळ रहिवाशांना हुसकावून लावत त्या जागी स्वतःला प्रस्थापित करणे आणि त्यानंतर तेथे हुकूमत गाजवण्याचे प्रकार घडले. यातूनच पश्चिम आशियाच्या शांततेला दृष्ट लागली. परिणामी, इस्त्रायलचा पॅलेस्टाईन, गाझा, इजिप्त, जॉर्डन, सीरिया, इराक, लेबनॉन, इराण अशा विविध देशांशी सातत्याने संघर्ष होत राहिला. या संघर्षास वांशिकतेचाही लवलेश आहे. अरब राष्ट्रे आणि मुस्लिम धर्मीय विरुद्ध ज्यू अशा संघर्षाची किनार त्यास आहे.

वांशिक युद्ध हे अतिशय भयानक असते. आजवरचा इतिहास तेच सांगत आला आहे. त्यामुळे आता पुन्हा तसा संघर्ष उभा राहणे जगाच्या हिताचे नाही, याची जाणीव इस्त्रायल आणि अमेरिकेसह सर्वच देशांनी ठेवणे गरजेचे आहे. मात्र, इस्त्रायल आणि अमेरिका यांनी डोळ्यावर पट्टी बांधल्याने त्यांच्याकडून तशी अपेक्षा ठेवणे गैर आहे.

इस्त्रायलकडून गाझा पट्टीमध्ये हजारो बळी घेतले जात आहेत. युद्ध आणि संघर्षाची एवढी भीषण दहशत तिथे आहे की, जे आता केवळ जगत आहेत, त्यांचे सुद्धा नजीकच्या काळात प्राण जाणार आहेत. अन्न, औषधे, उपचार यासह गरजेच्या वस्तूंचा नितांत तुटवडा तेथे आहे. इस्त्रायलकडून नागरी वस्त्यांवर दररोज दिवसा किंवा रात्री केव्हाही हल्ले केले जात आहेत. गाझा आणि पॅलेस्टाईन परिसरात असा एकही भाग नाही की जेथे हल्ल्याची शक्यता उरलेली नाही. संयुक्त राष्ट्रासह विविध संस्थांनी अहवालांमधून तेथील अनन्वित अत्याचार आणि क्रूरतेची मांडणी जगासमोर केली आहे. हे आकडे किंवा त्याचे वृत्त जगभर प्रसिद्ध केले जात आहे. प्रत्यक्षात इस्त्रायलने अमानुष हल्ल्यांचा हा ससेमिरा थांबवावा, यासाठी जगभरातून दबाव निर्माण होणे आवश्यक आहे; मात्र, महासत्ता असलेल्या अमेरिकेचा इस्त्रायलला असलेला भक्कम पाठिंबाच अनेकांना मूग गिळून गप्प बसवण्यास कारणीभूत ठरतो आहे. अमेरिकेला शिंगावर घेण्याची क्षमता असलेला रशियाच सध्या युक्रेनसोबतच्या युद्धात जायबंदी आहे. त्यामुळेच अमेरिका आणि इस्त्रायल यांचे फावते आहे. मात्र यात निष्पाप जनतेचा शेकडोच्या संख्येने बळी जात आहे.

इराण हा देश अण्वस्त्रे तयार करीत असल्याची वदंता थेट ८०च्या दशकापासून सुरू आहे. वारंवार तो आरोप नाकारत तसे काही नसल्याचे अहवाल प्रसृत झाले आहेत. असे असतानाही इराणचा हा अणुकार्यक्रम इस्त्रायलसाठी धोकादायक असल्याचे सांगत इराणवर हल्ले सुरू करण्यात आले आहेत. वास्तवतः इराण आणि इस्त्रायल यांची सीमा काही एकमेकांना लागून नाही. तरीही इस्त्रायलला इराणपासून असा धोका का वाटावा? आणि त्यांनाच तो का असावा? इराणच्या मानवी वस्तींसह महत्त्वाच्या ठिकाणांवर क्षेपणास्त्र डागून इस्त्रायलने रणशिंग फुंकले आहे. इराणनेही त्यास जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. अमेरिकेने मिठाची गुळणी तोंडात धरल्याने इस्त्रायलचे फावते आहे. अधिकाधिक आक्रमक आणि विध्वंसकारी हल्ला करून इराणचा अणुकार्यक्रम हाणून पाडण्याचा इस्त्रायलचा डाव असला, तरी तो यशस्वी होण्याची सुतराम शक्यता नाही. मुळात नेतान्याहू यांचीच खुर्ची अस्थिर आहे. देशांतर्गत जनता आणि राजकीय नेत्यांच्या मनातूनही ते उतरले आहेत. हीच संधी साधून युद्धाचा अवतार घेणे नेतान्याहू यांना सोयीचे वाटले आहे. यातून मानव जातीचे मात्र मोठे नुकसान होत आहे. मानवाधिकारांचे सर्रास उल्लंघन घडते आहे.

इस्त्रायल-इराण युद्धाचा परिणाम जगाच्या पाठीवर विविध प्रकारे होत आहे. इराण हा तेल उत्पादक व पुरवठादार देशांचा सदस्य आहे. भारत आणि इराण हे मित्र आहेत. इराणकडून भारताला रास्त दरात, भारतीय रुपयात आणि उधारीने तेल मिळते. अमेरिकेने इराणवर असंख्य निर्बंध लादले असले, तरी तेलाचा हुकमी एक्का त्यांच्याकडे आहे. अनेक देशांना इराणकडून तेलाचा पुरवठा होतो. शिवाय इराणलगतच्या समुद्र आणि खाडीतून जगाचा तेल व्यापार, मालवाहतूक होते. इस्त्रायलच्या हल्ल्यांमुळे ही वाहतूकही अडचणीत आली आहे. पहिल्या झटक्यात कच्च्या तेलाचे दर भडकले आहेत. आगामी काळात ते आणखी वाढू शकतात. यातून देशोदेशी महागाईचा भडका उडण्याची चिन्हे आहेत. भारतही या संकटातून वाचू शकणार नाही. म्हणजेच, इस्त्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाचा थेट आणि अप्रत्यक्ष फटका अनेक देशांना बसणार आहे. असे असतानाही हे युद्ध थांबावे यासाठी ठोस प्रयत्न होताना दिसत नाही. मुजोरी करणाऱ्या इस्त्रायल किंवा त्यास पाठिंबा देणाऱ्या अमेरिकेवर काहीही दबाव निर्माण होत नाही. यामुळेच इस्त्रायलची मनमानी वाढत आहे.

इस्त्रायलला वेसण घालण्यात जगातील १९४ देशांना अपयश येणे हे अनेक समस्यांना जन्म देणारे आहे. तसेच, ह्यआपले कुणी वाकडे करू शकत नाहीह्ल या खुमखुमीलाही बळ देणारे आहे. यातूनच चीन हा तैवानचा घास घेण्यासाठी सरसावू शकतो. सार्वभौमत्व धोक्यात येणे हे कुठल्याही देशासाठी आव्हानात्मकच. तसेच, त्याचे रक्षण करण्यात अन्य देशांकडून जाणीवपूर्वक अडथळे आणणे हे सुद्धा घातक आहे. त्यामुळे सारासार विचार करता कुठल्याही सार्वभौम देशावर अचानक आणि हिंसक हल्ला करणे हे अत्यंत चुकीचे आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर याबाबत केवळ चिंता व्यक्त होते. अशा कृत्यांना वेसण घालण्यासाठीच संयुक्त राष्ट्राची स्थापना झाली असली, तरी ही संस्था दुबळी असल्याचे प्रतीत होत आहे. दुसऱ्या देशावर आक्रमण करणे म्हणजे स्वतःचा देश सुरक्षित ठेवणे हा प्रघात रुजणे म्हणजे मानवी अस्तित्व अधिकाधिक धोक्यात जात असल्याचे संकेत आहेत. इस्त्रायलने आपल्या कृतीतून त्याची ठळक जाणीव संपूर्ण जगाला करून दिली आहे.

# कायद्याच्या उद्देशाचे महत्त्व पटवून देणारा निकाल



**शोषितांवर, पीडितांवर अन्याय करणार्यांविरोधात कायद्याचा बडगा उगारला गेलाच पाहिजे, पण बदलत्या समाजरचनेत दोन जीवांमध्ये प्रेमसंबंध फुलत असतील आणि त्यातून पुढे शरीरसंबंधही निर्माण होत असतील, तर केवळ सज्ञान नाही, म्हणून त्यांच्यावर कायद्याचा जरब बसविण्याचा प्रयत्न करणे योग्य नसल्याचे ओडिशा उच्च न्यायालयाने दिलेल्या एका निकालातून दिसून आले आहे. काय सांगतो हा निकाल, हे शांतपणे समजून घेतले पाहिजे. पुरोगामी समाजातील नागरिक म्हणून आपल्यासाठी ते महत्त्वाचे आहे.**

कोणताही कायदा जेव्हा कायदे मंडळाकडून अस्तित्वात आणला जातो, त्यावेळी त्याचा उद्देश संबंधित कायदानिर्मिती प्रक्रियेच्या विधेयकात नमूद केलेला असतो. हा उद्देश खूप महत्त्वाचा असतो. कायदा आणण्यामागचा उद्देश आणि त्यातील तरतुदी सुसंगत हव्यात. जेव्हा न्यायालयांकडून कोणत्याही कायद्यातील तरतुदींनुसार निकाल दिला जातो, त्यावेळी तो कायदा आणण्यामागचा कायदे मंडळाचा उद्देश काय होता, यालासुद्धा महत्त्व दिले जाते. अनेकवेळा खटल्यांमधील तथ्यामध्ये वेगवेगळे कंगोरे असतात. समाजातील चालीरिती, रुढी-परंपरा यांच्यानुसार काही लोकांना काही गोष्टी आवडत नाहीत. मग त्यांच्याकडून कायद्यातील तरतुदींचा वापर केला जातो आणि विरोधातील पक्षकारांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला जातो. जेव्हा या सगळ्याकडे न्याय देण्याच्या प्रक्रियेतून बघण्याची वेळ न्यायाधीशांवर येते, त्यावेळी त्यांना कायद्यातील तरतूद काय सांगते, संबंधित घटनेतील तथ्ये काय आहेत, पुरावे काय आहेत हे सगळे बघतानाच संबंधित कायदा करताना कायदे मंडळाचा उद्देश नक्की काय होता, याचाही विचार करावाच लागतो.

ओडिशामधील उच्च न्यायालयाने नुकताच एक निकाल दिला. या निकालामध्ये न्यायालयाने लैंगिक अत्याचारापासून लहान मुलांचे संरक्षण कायदा, २०१२ (पोक्सो) आणण्याच्या कायदे मंडळाच्या उद्देशांचा विचार केला आणि त्यानुसार संबंधित प्रकरणामध्ये निकाल दिला. या प्रकरणातील आरोपी सज्ञान नव्हता. किशोरवयातच त्याच्यामध्ये आणि पीडितेमध्ये प्रेमसंबंध निर्माण झाले. या प्रेमसंबंधांतून त्यांच्यामध्ये शरीरसंबंधही झाले. लग्न करण्याचे आश्वासन संबंधित किशोरवयीन आरोपीने पीडित मुलीला दिले होते. पुढे तसे न घडल्याने पीडित मुलीच्या कुटुंबियांनी आरोपीविरोधात पोक्सोसह भारतीय दंड विधान संहितेच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला होता. हे प्रकरण पोहोचले ओडिशा उच्च न्यायालयापर्यंत. या न्यायालयातील न्या. संजीवकुमार पाणिग्रही यांच्या खंडपीठाने या प्रकरणात निकाल दिला. हा निकाल देताना न्यायालयाने एक महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले.

न्यायालयाने म्हटले आहे की, १८ वर्षांखालील मुला-मुलींचा शरीरसुखासाठी वापर करणारे आणि दोन किशोरवयीन मुलांमध्ये प्रेमसंबंधातून आलेले शरीरसंबंध यांच्यामध्ये फरक करायला हवा. किशोरवयीन मुलांमध्ये प्रेमसंबंधातून आलेले शरीरसंबंध हे एकमेकांच्या संमतीने झालेले असतील तर समाजाच्या चौकटीत ते बसत नाहीत, म्हणून त्याच्याकडे गुन्हा म्हणून पाहणे योग्य नाही. देशात जेव्हा पोक्सो कायदा आणला गेला, त्यावेळीही कायदे मंडळाला असे काही अभिप्रेत नव्हते. समाजातील रुढी-परंपरांवर, चालीरितींवर उत्तर म्हणून हा कायदा आणलेला नाही, तर केवळ लहान वयातील मुला-मुलींचे कोणाकडून लैंगिक शोषण केले जाऊ नये, यासाठी या कायद्याची निर्मिती करण्यात आली आहे. तोच या कायद्याचा उद्देश आहे, असे न्यायालयाने आपल्या निकालपत्रात म्हटले आहे.

बदल हा सतत घडत असतो आणि तो स्वीकारावाही लागतो. समाज जसजसा पुढे जातो, तसतशा नव्या गोष्टी घडत असतात. जेव्हा न्यायाधीशांना कायद्यातील तरतुदींचा अन्वयार्थ लावून निकाल द्यायचा असतो, त्यावेळी समाजातील बदललेले नातेसंबंध, बदललेल्या धारणा, या सगळ्यांचा विचार करावाच लागतो. हे करणे म्हणजे कायद्याचा अन्वयार्थ लावताना न्यायाधीशांनी त्यांच्या स्वातंत्र्याचा वापर करणे. न्यायाधीशांनी कायद्याच्या चौकटीच राहूनच आपल्या सद्सद्विवेकबुद्धीने निकाल देणे, असेही याला म्हणता येईल. संबंधित खटल्यामध्ये न्यायालयाने याच पद्धतीने खटल्यातील सर्व घटना-घडामोडी पाहून मग आपल्या स्वातंत्र्याचा वापर करून निकाल दिला. न्यायाधीशांनी पोक्सो कायद्यातील तरतुदींचा आहे तसा अर्थ लावून निकाल देण्यापेक्षा तथ्ये काय सांगतात, समाजात सध्या काय सुरू आहे, याचाही निकाल देताना विचार केला.

मुलं लवकर शहाणी होतात, हे तर आपण ऐकत आलो आहोतच. या लवकर शहाणं होण्यातूनच त्यांच्याकडून काही कृती घडतात. आता या कृतीकडे कसे बघायचे हे वडीलधाऱ्या लोकांनी ठरवायचे असते. हेच वडीलधारे जर कायद्यातील तरतुदींचा आधार घेऊन या किशोरवयीन मुला-मुलींमधील नाते उखडून टाकण्याचा प्रयत्न करणार असतील, तर तिथे गरज पडेल तेव्हा न्यायालयांनी हस्तक्षेप केला पाहिजे. या प्रकरणात अगदी याच पद्धतीने न्यायालयाने हस्तक्षेप करीत समाजातील रिती, रुढी, परंपरा यांच्यासाठी कायद्याचा वापर करणे योग्य नसल्याचे दाखवून दिले.

शोषितांवर, पीडितांवर अन्याय करणाऱ्यांविरोधात कायद्याचा बडगा उगारलाच पाहिजे. पण बदलत्या समाजरचनेत दोन जीवांमध्ये प्रेमसंबंध फुलत असतील त्यातून पुढे शरीरसंबंधही निर्माण होत असतील, तर केवळ सज्ञान नाही, म्हणून त्यांच्यावर कायद्याचा जरब बसविण्याचा प्रयत्न करणे योग्य नसल्याचे या खटल्यातील न्यायाधीशांनी म्हटले आहे. कोणालाही कायद्यातील तरतुदींच्या आधारे शिक्षा द्यायची असेल, तर एका संकल्पनेचा विचार करावाच लागतो. 'डॉक्टराईन ऑफ प्रपोर्शनॅलिटी' अशी ही संकल्पना आहे. कोणालाही शिक्षा करताना ती संबंधित व्यक्तीने केलेल्या गुन्हेगारी कृत्याच्या गांभीयार्नुसारच केली पाहिजे. उदाहरणार्थ उद्या एखाद्याने कोणाचे पाकीट चोरले, तर त्याला थेट फाशीची शिक्षा दिली जाऊ नये. दोषी आढळला तर त्याला शिक्षा नक्कीच झाली पाहिजे. पण गुन्ह्यानुसार शिक्षेचे प्रमाण आणि त्याची तीव्रता कमी-अधिक झाली पाहिजे. याच संकल्पनेचा आधारही न्यायालयाने या खटल्यामध्ये घेतला.

न्यायालयाने या निकालात म्हटले आहे की, फक्त मुलांच्या काळजीपोटी नव्हे, तर अनेकवेळा त्यांच्यावर आपला दबाव टाकण्यासाठी पालकांकडून मुलांच्या विविध कृत्यांवर आक्षेप घेतले जातात. अनेकवेळा आपल्या पाल्याचे या प्रकरणात नक्की किती नुकसान झाले, याचा समतोलपणे विचार न करता रागाच्या भरात गुन्हे दाखल केले जातात. प्रतिगामी विचारसरणी असलेल्या समाजात आणि तेथील कुटुंबव्यवस्थेमध्ये हे सर्रासपणे चालते. प्रतिगामी समाजव्यवस्थेत कुटुंबाची प्रतिष्ठा ही मुलींच्या वर्तनाशी चुकीच्या पद्धतीने जोडली जाते. या स्वरुपाच्या समाजामध्ये वैयक्तिक स्वातंत्र्याला कायमच दुय्यम स्थान दिले जाते.

जेव्हा अशी प्रकरणे न्यायालयापुढे येतात, त्यावेळी सर्वात आधी आरोपी आणि पीडिता यांच्यातील वयाचे अंतर आणि त्यांच्यातील नातं समजून घेतलं पाहिजे. जर पीडितेवर आरोपीने लैंगिक अत्याचार केल्याचे तथ्यांमधून दिसून येत नसेल, तर मग त्या गोष्टीकडे वेगळ्या पद्धतीने पाहण्याची गरज आहे. एकमेकांच्या प्रेमात असलेले किशोरवयीन मुलगा आणि मुलगी यांना एकमेकांपासून दूर नेण्यासाठी जर कायद्यातील तरतुदींचा कुटुंबातील लोकांकडून हेतूपूर्वक वापर केला जाणार असेल, तर तिथे न्यायालयाने वेगळ्या पद्धतीने विचार केला पाहिजे. कोणीही स्वतःच्या फायद्यासाठी कायद्याचा शस्त्र म्हणून वापर करू नये, हेसुद्धा या खटल्याच्या निमित्ताने न्यायालयाने स्पष्ट केले.

समाजाच्या भावना या खूप तात्कालिक असतात. एखादा विषय माध्यमांकडून पुढे आणला गेला की समाजातील लोकांकडून त्यांच्या पूर्वानुभवानुसार त्यावर प्रतिक्रिया दिल्या जाऊ लागतात. रितीरिवाज, रुढी-परंपरा हे सगळे अशा वेळी आपापली भूमिका निभावत असतात. पण जेव्हा विषय कायद्याच्या चौकटीवर एखादी गोष्ट जोखण्याचा येतो, त्यावेळी आधी सांगितलेल्या गोष्टींना फारसे महत्त्व उरत नाही. तिथे कायदा, त्यातील तरतुदी, खटल्यातील तथ्ये, सादर केलेले पुरावे, वकिलांचे युक्तिवाद, सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांनी आधी दिलेले निकाल यांनाच सर्वाधिक महत्त्व असते. या सगळ्यांच्या वर असते ते संबंधित न्यायाधीश या सगळ्याकडे कसे बघतात. कारण त्यांच्यासमोर जो काही युक्तिवाद झाला असेल, जे काही पुरावे दिले गेले असतील त्यांच्या आधारावरच त्यांना आपले मत आणि मग निकाल निश्चित करायचा असतो. या खटल्यात ओडिशा उच्च न्यायालयाने न्यायिक स्वातंत्र्य घेत आणि कायद्याच्या उद्देशांचा विचार करत आपला निकाल दिला, म्हणूनच असे निकाल या स्वरुपाच्या पुढील विविध खटल्यांसाठी मार्गदर्शक ठरतात.



# अमेरिका-चीन व्यापार तह

अमेरिका आणि चीन यांच्यात व्यापाराबाबतच्या करारावर सहमती झाल्याने दोन्ही देशांमधील व्यापारयुद्ध थांबण्याची चिन्हे दिसत आहेत. अर्थात, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे आजवरचे बेभरवशाचे वर्तन आणि व्यापार करारातील बाहेर न आलेले तपशील यांमुळे पुन्हा व्यापारयुद्ध सुरू होऊ शकते. मात्र, सध्या तरी तह झाला आहे. या कराराची घोषणा खुद्द ट्रम्प यांनीच केली आहे. अशा घोषणा करायला त्यांना आवडते. मात्र, अनेकदा ते घाईही करतात; त्यामुळे त्यांची घोषणा प्रत्यक्षात येतेच असे नाही, असा अनुभव आहे.

चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी शिक्कामोर्तब केल्यावर दोन्ही देशांमधील व्यापाराबाबतचा हा करार कार्यान्वित होईल. सत्तेवर आल्यावर आयातशुल्कात भरमसाठ वाढ करून ट्रम्प यांनीच या युद्धाची सुरुवात केली होती. ट्रम्प यांच्या प्रत्येक चालींना चीनने रोखठोक उत्तर दिले. ट्रम्प यांनी आपल्या देशाला पुन्हा महान करण्याचा विडा उचलला असला, तरी अमेरिकेच्या अन्य देशांवरील अलंबित्वाकडे त्यांनी दुर्लक्ष केले होते. आयातशुल्क वाढविण्याचे पाऊल उचलल्यानंतर चीनने दुर्मीळ खनिजांच्या निर्यातीवर बंदी घातली. अणुभट्ट्यांपासून इलेक्ट्रिक वाहनांपर्यंत आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांपासून दूरचित्रवाणी संचापर्यंत विविध उत्पादनांत आवश्यक असलेल्या खनिजांचा अमेरिकेचा पुरवठा ठप्प झाला. त्यानंतर चिनी उत्पादनांवर अमेरिकेने बंदी घातली. एकीकडे दोन्ही देशांकडून जशास तसे पावले उचलली जात असली, तरी वाटाघाटीही सुरू होत्या. जीनिव्हा आणि लंडन येथे वाटाघाटी झाल्यानंतर उभयमान्य तोडगा निघाल्याचे ट्रम्प यांच्या विधानांवरून दिसते.

अमेरिकेला दुर्मीळ खनिजे पुरविण्यास चीन तयार झाला असून, चिनी विद्यार्थ्यांना आपल्या विद्यापीठांत प्रवेश देण्यास अमेरिका तयार झाली आहे. चिनी मालावर अमेरिका ५५ टक्के आयातशुल्क आकारणार आहे, तर चीनकडून दहा टक्के शुल्क आकारले जाईल. या कराराद्वारे दोन्ही देशांनी व्यापारयुद्ध थांबविण्यासाठी उचललेले पुढचे पाऊल ही सकारात्मक बाब आहे. व्यापारयुद्ध ते व्यापारकरार हा गेल्या काही महिन्यांतील प्रवास महत्त्वाचा आहे. जागतिकीकरणाच्या आजच्या काळात सर्व देश एकमेकांवर अवलंबून आहेत.

या परस्परावलंबित्वामुळे कोणत्याही देशाला, अगदी अमेरिकेलाही. एकतर्फी निर्णय घेता येत नाही. त्यामुळे देशांतर्गत राजकारणासाठी अन्य देशांवर दबाव टाकण्याचे धोरण फार काळ चालू शकत नाही. ट्रम्प यांनी मोठा आव आणून दबावाचे राजकारण केले तरी ते यशस्वी होत नाही, हे या प्रकरणातून स्पष्ट झाले आहे.

## गुजराती समोसा

**साहित्य सारणासाठी :** एक कप भिजवलेले पोहे, मिक्स भाज्या, बटाटा, गाजर, बीन्स, फ्लॉवर, सिमला मिरची, एक टेबलस्पून तीळ, हिंग, मोहरीची फोडणी, धने-जिरेपूड, आलं, हिरवी मिरची वाटून, लिंबाचा रस, साखर, मीठ, तिखट.

**कृती :** फोडणी बनवा. त्यात आलं, मिरच्या तीळ घाला. वाफवलेल्या भाज्या घाला. पोहे घाला. गार झाल्यावर धने-जिरेपूड, मीठ, साखर, लिंबाचा रस, कोथिंबीर घाला.

**कव्हरसाठी :** दोन कप मैदा, अर्धा चमचा बेकिंग पावडर, मीठ चवीनुसार, अंदाजाने तूप घालून घट्ट भिजवा. नेहमीप्रमाणे सारण भरून समोसे बनवून तळा. तेलात तळा. खजुराच्या चणीबरोबर द्या. त्यासाठी पाव किलो खजूर, शंभर ग्रॅम चिंच, थोडा गुळ, धने-जिरेपूड, तिखट, मीठ सर्व उकळून गाळून घ्या.



## गुलाबपाणी : केसांना सतेज करणारा नैसर्गिक उपाय!

गुलाबाची मोहकता आणि मंद सुगंध नेहमीच आपला मूड तत्काळ रिफ्रेश करायला मदत करतो. पण केवळ बुकेमध्ये किंवा गजरा आणि हारांपुरताच फुलांचा वापर नसतो. गुलाब हे फूल जितके मोहक दिसते तितकेच त्याचे आरोग्यदायी फायदेदेखील आहेत.

**सौंदर्य** खुलवण्यासाठीदेखील गुलाब फायदेशीर ठरते. त्यामधील मॉइश्चरायझिंग घटक, टोनिंग करण्याची क्षमता त्वचेमधील दाह कमी करून त्वचेला सतेज बनवते. गुलाबाचे आरोग्यदायी गुणधर्म, सौंदर्य खुलवण्याची क्षमता यासोबतीने केसांचीही चमक वाढवण्यासाठी फायदा होतो हे तुम्हाला ठाऊक आहे का? म्हणूनच केसांचे आरोग्य जपण्यासाठी ब्युटी एक्स्पर्ट दिलेला हा खास सल्ला नक्की जाणून घ्या.




### गुलाबपाणी कसे ठरते फायदेशीर?

गुलाबाच्या पाकळ्या पाण्यात मिसळून लावल्यास त्वचेला हायड्रेट करतात, पण त्यासोबतच त्वचेला सतेज करण्यास, मॉईश्चराईज्ड करण्यास मदत करतात. मात्र गुलाबाच्या पाकळ्या पाण्यात मिसळून केसांना लावल्यास टाळूवरील अतिरिक्त तेल प्रमाणात राहण्यास मदत होते. सोबतच टाळूवरील pH balance राखण्यास मदत होते. यासोबतच व्हिटॅमिन्स, मिनरल्स आणि ॲण्टीऑक्सिडंट घटक यांचा मुबलक साठा असतो. गुलाबातील इसेन्शियल ऑईल शुष्क त्वचेची समस्या आटोक्यात ठेवण्यास मदत करते. त्यामुळे शाम्पूसोबत त्याचा वापर केल्यास टाळूवरील त्वचा मॉईश्चराईज्ड होण्यास मदत होते तसेच हेअर फोलिकल्स मजबूत होतात.



### फ्रिझी आणि निस्तेज केसांवर कशाप्रकारे वापराल गुलाब पाणी?

**निस्तेज केसांसाठी**

केसांवर कर्लिंग आयर्न किंवा ब्लो ड्रायर वापरत असाल तर केसांचे नुकसान होते. केस अधिक शुष्क होतात. केसांना पुन्हा सतेज करण्यासाठी गुलाबपाणी फायदेशीर ठरते. याकरिता जोजोबा ऑईलमध्ये गुलाबपाणी मिसळा. या मिश्रणाने टाळूवर हलकासा मसाज करा. मसाज केल्यानंतर सुमारे १० मिनिटांनंतर कोमट पाण्याने केस स्वच्छ धुवावेत. या उपायाने केसांचे नुकसान आटोक्यात ठेवण्यास मदत होते. कर्लिंग आयर्न किंवा ब्लो ड्रायरमुळे केस खराब झाल्यास हा उपचार फायदेशीर ठरतो.

**फ्रिझी हेअर**

फ्रिझी हेअरचा त्रास आटोक्यात ठेवण्यासाठी गुलाबपाण्यासोबत कोरफडीचा गर मिसळा. हे मिश्रण एकत्र करून टाळूवर हलकासा मसाज करा. सुमारे ३० मिनिटांनंतर पाण्याने केस स्वच्छ धुवावेत.

## दररोज जेवणात टाका चिमूटभर हिंग कधी होणार नाही हे ५ आजार

भारतीय जेवणात स्वाद आणि सुगंध वाढवण्यासाठी हिंगाची फोडणी दिली जाते. हिंगाचा सुवास तेज आणि जेवण्याची इच्छा जागृत करणारा असतो. आयुर्वेदात देखील याचे अनेक फायदे सांगितले गेले आहेत. आपण दररोज चिमूटभर हिंग वापराल तर अनेक आजारांपासून मुक्ती मिळू शकेल. हिंग पोट, लिव्हर आणि डोळ्यासाठी फायदेशीर ठरतो. जाणून घ्या रोज हिंगाचे सेवन केल्याने आरोग्यावर काय प्रभाव पडेल.

**पोटासंबंधी आजार**

हिंग पोटासाठी अत्यंत फायदेशीर आहे. दररोज हिंगाचे सेवन केल्याने पोटासंबंधी समस्या जसे अपचन, गॅस सारख्या समस्या दूर होतात. याने पोटात गॅस, पोटातील किडे, मरोड आणि पोटासंबंधी सर्व वेदनांपासून मुक्ती मिळते.

**बीपीची समस्या**

हिंगात रक्त पातळ करण्याचे गुण असतात. म्हणून हे ब्लड प्रेशरच्या आजाराने त्रस्त लोकांसाठी फायदेशीर आहे. याने नसांमध्ये बल्ड क्लॉटिंग सारखी समस्या होत नाही ज्याने ब्लड प्रेशर अनियंत्रित होण्यापासून मुक्ती मिळते.

**श्वासासंबंधी आजार**

खोकल्याची समस्या असल्यास हिंगाचे सेवन फायदेशीर आहे. हिंग सामान्य खोकला, कोरडा खोकला, इंफ्लूएंजा, ब्रोन्काइटिस आणि दमा सारख्या आजारापासून दूर ठेवतं. डाळ, सांभार आणि भाज्यामध्ये हिंग वापरलं जाऊ शकतं. श्वासासंबंधी आजार असल्यास हिंगात जरासं पाणी मिसळून छातीला लावल्याने



आराम मिळतो. याव्यतिरिक्त खोकला आणि दमा सारख्या आजारात आपण हिंगात मध मिसळून सेवन करू शकता.

**मासिक धर्म**

अनेक महिलांना मासिक धर्म दरम्यान वेदना सहन कराव्या लागतात. दररोज हिंगाचे सेवन केल्याने या दरम्यान होणाऱ्या वेदनांपासून मुक्ती मिळते.

हिंग प्रोजेस्ट्रॉन हार्मोन्स उत्पादनात मदत करतं, ज्याने ब्लड फ्लो सुरळीत राहतं. पीरियड्सदरम्यान वेदनापासून मुक्तीसाठी एक ग्लास ताकात २ चिमूट काळं मीठ आणि १ चिमूट हिंग मिसळून प्यावं.

**डोकेदुखी**

हिंगात शरीरातील आंतरिक सूज कमी करण्याची क्षमता असते. साधारणतः डोक्यातील आर्ट्रिजमध्ये सूज असल्यामुळे डोकेदुखीचा त्रास सहन करावा लागतो. अशात रोज हिंगाचे सेवन केल्याने डोकेदुखीपासून मुक्ती मिळू शकते. डोकेदुखीचे प्रमाण अधिक असल्यास एका ग्लासात २ चिमूट हिंग उकळून घ्या. कोमट झाल्यावर दिवसातून दोनदा प्यावे.

## चमकदार दातांसाठी झोपण्याच्या वेळेस करा ही कामे



**आजच्या जाहिरातीच्या युगात सारेच टुथपेस्ट ब्रॅण्ड चमकदार दातांचा दावा करतात. डेण्टिस्टकडे चमकदार दातांसाठी अनेक ट्रीटमेंट उपलब्ध असतात. पण अनेक घरगुती उपायांनीही तुम्ही तुमचे दात चमकदार बनवू शकता.**

नारळाचे तेल ऑरगॅनिक आणि नॅच्युरल टीथ व्हाईटनर आहे. नारळाच्या तेलाने तुम्ही तुमचे दात चमकवू शकता. यासाठी थोडेसे नारळाचे तेल घेऊन १५ मिनिटे तोंडात ठेवा. त्यानंतर साध्या पाण्याने चूळ भरा. यामुळे फायदा होईल. दात चमकवण्यासाठी सोपा उपाय म्हणजे स्ट्रॉबेरीज. स्ट्रॉबेरीच्या गरात चिमूटभर बेकिंग सोडा मिसळा. हे मिश्रण ब्रशवर घेऊन दात घासा. यामुळे दातांवरील पिवळेपणा दूर होईल. ॲपल सिडार व्हिनेगरही दात चमकावण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. याचे काही थेंब दातांवर चोळा. अधिक फायद्यासाठी सकाळी ब्रश करण्याआधी या व्हिनेगरने दात चोळा.

## जेवण केल्यानंतर लगेच झोपण्याचे दुष्परिणाम

अवेळी, तसेच लगेच झोपे येणे धोकायदायक आहे, अशी झोप टाळली पाहिजे, कारण दुपारी जेवल्यानंतर एक छोटी डुलकी घ्यायची सवय काहींना असते. जेवल्यावर लगेच झोपणे धोकादायक ठरू शकतं. कारण जेवल्यानंतर, नाष्टा केल्यानंतर किंवा काहीही खाल्ल्यानंतर झोपणं हे शरीराच्या आरोग्यासाठी हानीकारक मानलं जातं.

**चयापचय म्हणजे पचनास अडथळा :** जेवल्यावर तातडीने झोपल्यास पोटात गेलेल्या अन्नाचं योग्य पद्धतीने पचन होत नाही. यामुळे शरीरात एक विशिष्ट प्रकारचं आम्ल तयार होतं आणि ते छातीत जातं. यामुळे अनेक वेळा आंबट ढेकरही येतात. शिवाय अन्नाचं योग्य पद्धतीने पचन न झाल्यास अनेक आजार जडू शकतात.

**वजन वाढण्याचे दुष्परिणाम :** जर तुम्ही जेवल्यानंतर लगेच झोपलात तर, कॅलरीज योग्य पद्धतीने बर्न होत नाहीत. त्यामुळे वजन वाढण्यास मदत होते. आपणं जेवढं खातो त्यापेक्षा जास्त शरीरातील कॅलरीज बर्न करणं गरजेचं असतं. यामुळे शरीराचं कार्य उत्तम राहण्यास मदत होतं.

**ॲसिडीटीचा त्रास वाढतो :** ॲसिडीटीमुळे शरीराला फार त्रास होतो, शिवाय झोपही लागत नाही. तातडीने झोपल्याने पोटात आम्ल तयार होतं. यामुळे ॲसिडीटी होण्याची दाट शक्यता असते.

**हृदयासंबंधीचे आजार बळावतात :** जेवल्या जेवल्या झोपल्याने पचनक्रिया बिघडते. याचा परिणाम रक्तदाब आणि रक्तातील साखरेचं प्रमाण वाढतं. यामुळे हृदयावर परिणाम होऊन त्यासंबंधीचे आजार बळावू शकतात. त्यामुळे जेवल्यावर तातडीने झोप घेणे धोकेदायक आहे.



## खेळानंतर स्नॅक्सचे सेवन मुलांसाठी घातक

अनेक मुले खेळून आल्यानंतर जास्त स्नॅक्स सेवन करतात, त्यांच्यात त्यामुळे अनावश्यक उष्मांक वाढतात. परिणामी त्यांना आवश्यक असलेला आरोग्यावरील परिणाम साध्य होताना दिसत नाही, त्यानंतर मग आहारात बदल करण्याची वेळ येते, असे एका संशोधनात दिसून आले आहे. 'अमेरिकन जर्नल ऑफ हेल्थ बिहेॅवियर' या नियतकालिकात म्हटले आहे की, मुलांमध्ये खेळत असताना प्रत्येक खेळातून १७० उष्मांक जाळले जातात. हे खरे असले तरी खेळानंतर मुले अंदाजे २१३ उष्मांक घेतात. शाळेत खेळानंतर मुले दमतात व त्या नादात ते जास्त स्नॅक्स सेवन करतात. तरुणांच्या क्रीडा स्पर्धा, वाढदिवस यात स्नॅक्स सेवन करण्याची संस्कृतीच अमेरिकेत रूढ आहे, असे ब्रिगहॅम यंग विद्यापीठाच्या प्रमुख संशोधक लोरी स्प्रुअन्स यांचे म्हणणे आहे. खेळून आल्यानंतर मुलांनी गोड पदार्थ सेवन केल्याने त्यांच्यात उष्मांक वाढतात. या संशोधनानुसार तिसरी-चौथीतील मुले फुटबॉल, फ्लॅग फुटबॉल, बेसबॉल, सॉफ्टबॉल खेळतात. त्यांचे हे खेळ शारीरिक व्यायाम देणारे असले तरी नंतर ते उष्मांक वाढवणारे स्नॅक सेवन करतात त्यामुळे हवा तो परिणाम साध्य होत नाही. आईवडीलच या मुलांना ८० टक्के वेळा स्नॅक्स घेऊन देतात. ९० टक्के वेळा गोड शीतपेयेही घेऊन देतात, त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होतो.

संशोधकांच्या मते खेळानंतरच्या स्नॅक्समधून २६ ग्रॅम साखर पोटात जाते. यात साखरयुक्त शीतपेये व इतर पेये मोठी घातक ठरतात. मुलांनी वयाच्या पाचव्या वर्षांपासून साठ मिनिटे तरी खेळले पाहिजे. त्याबरोबर जर उष्मांक अतिरिक्त वाढत असतील तर ते घातक आहे त्यामुळे मुलांना



## अशा पद्धतीने घरीच तयार करा फाऊंडेशन पावडर

**सध्या** लग्नसराईचा काळ सुरू आहे. आज कोणा मैत्रिणीचा साखरपुडा आहे तर उद्या मित्राचं लग्न. घरातही कोणत्या ना कोणत्या नातेवाईकाचे लग्न असतेच. या सगळ्यात प्रत्येक वेळी पार्लरमध्ये जाऊन मेकअप करणं परवडणारं असतंच असं नाही.





अनेकदा फाऊंडेशन, काजळ, लिपस्टिक आणि आयलायनर लावूनही मुली सुंदर दिसतात. पण तुम्हाला माहीत आहे का बाजारात मिळणारे फाऊंडेशन तुम्ही अगदी काही मिनिटांत घरच्या घरी करू शकता. तुम्ही हजारो रुपये महागड्या फाऊंडेशनसाठी खर्च करता का? तुम्ही जे महागडे मेकअपचे साहित्य वापरता त्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या गोष्टी या त्वचेसाठी हानीकारक असतात. पण हेच मेकअपचे साहित्य जर तुम्हाला घरी तयार करता आले तर? चला तर मग घरच्या घरी फाऊंडेशन पावडर कसे तयार केले जाऊ शकते ते वाचू..

**साहित्य :**

- ऑलीव ऑईल
- जोजोबा ऑईल
- बदामाचे तेल
- चेहऱ्याला लावायची पावडर
- कोको पावडर

**कृती :**

चेहऱ्याला लावायच्या पावडरमध्ये कोको पावडर, ऑलीव ऑईल, जोजोबा ऑईल, बदामाचे तेल योग्य प्रमाणात टाका. हे मिश्रण जास्त जाड ही नको आणि जास्त पातळ ही नको. तयार झालेली पावडर बॉक्समध्ये टाकून सेट करा. १० मिनिटांत तयार आहे घरच्या घरी फाऊंडेशन पावडर.

## ब्राऊन राईस खा आणि निरोगी राहा

**तुम्हाला भात मनापासून आवडत असेल, पण वजन वाढेल या भीतीने तुम्ही तुमच्या आवडत्या अन्न पदार्थापासून लांब राहत असाल, तर आता तुम्हाला तुमचा मोह आवरण्याची जरासुद्धा गरज नाही. तुम्ही तुमच्या आहारामध्ये ब्राऊन राईस समाविष्ट करा आणि वजन वाढेल याची काळजी न करता भाताचे सेवन करा. ब्राऊन राईस म्हणजे नक्की काय, तर पॉलिश न केलेल्या, अन-रिफाइन्ड तांदळाला ब्राऊन राईस असे म्हटले जाते. तांदळाच्या दाण्याला सालीची दोन ते तीन आवरणे असतात. ब्राऊन राईस तयार करण्यासाठी तांदळावरील केवळ सर्वात बाहेरची, जाडसर असलेली साल काढली जाते. बाकीच्या पातळ साली तांदळावर तशाच ठेवल्या जातात, म्हणूनच हा तांदूळ दिसायला 'ब्राऊन', म्हणजेच भुरकट रंगाचा दिसतो. पांढरा तांदूळ तयार होताना त्यावरील सर्वच सालींची आवरणे काढून टाकली जातात, त्यामुळे तो तांदूळ शुभ्र पांढरा दिसतो. पण पांढऱ्या तांदळामध्ये केवळ स्टार्च असतो.**

**ब्राऊन** राईस आणि पांढऱ्या तांदळामध्ये कॅलरीज आणि कर्बोदकांचे प्रमाण जरी एकसमान असले, तरी पांढरा तांदूळ बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये, त्यामध्ये असलेले बी३, बी१, बी६, ही जीवनसत्त्वे, मॅग्नेशियम, फॉस्फरस, लोह, फायबर आणि फॅटी ॲसिड्स ही पोषक तत्त्वे पूर्णतः नष्ट होऊन जातात. त्यामुळे पांढऱ्या तांदळापेक्षा ब्राऊन राईसचे सेवन आरोग्यास अधिक हितकारी असल्याचे आहारतज्ज्ञांचे म्हणणे आहे. ब्राऊन राईस मध्ये कर्बोदके, प्रथिने, फायबर, मॅग्नेशियम, थियामीन, फॉस्फरस, पोटॅशियम इत्यादी महत्त्वपूर्ण पोषक तत्त्वे असून, याचे सेवन शरीराच्या आरोग्यासाठी अतिशय फायद्याचे आहे.



ब्राऊन राईसमध्ये फायबर मोठ्या प्रमाणावर असून, यामुळे रक्तामधील घातक कोलेस्टेरोलचे प्रमाण कमी होते. तसेच रक्तामधील शुगर नियंत्रित होते.

त्यामुळे मधुमेह असणाऱ्यांना याच्या सेवनाने विशेष फायदा मिळतो. फायबरचे प्रमाण यामध्ये जास्त असल्याने भूक शमते, तसेच अन्नाचे पचन व्यवस्थित होते. त्यामुळे बद्धकोष्ठ किंवा पचनाशी निगडित इतर समस्या दूर होतात.

फायबरमुळे कोलोन आणि पचनेंद्रियाचे कार्य सुरळीत ठेवण्यास मदत होते व कोलेस्टेरोलचे प्रमाण नियंत्रित राहिल्याने हृदयाचे आरोग्यदेखील चांगले राहते.

ब्राऊन राईसमध्ये असलेल्या सेलेनियम आणि फेनोल्स या तत्त्वांमुळे कोलोन कॅन्सर होण्याचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होतो. तसेच ही तत्त्वे थायरॉइड ग्रंथीचे कार्य नियंत्रित करण्यास सहाय्यक आहेत. यामध्ये असलेले मॅग्नेशियम हाडांच्या आरोग्यासाठी चांगले असून, त्यामुळे नर्व्हस सिस्टमही चांगली राहते. शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यास देखील ही सर्व तत्त्वे सहाय्यक आहेत. यामध्ये असलेल्या फायबरमुळे पोट खूप काळ भरलेले राहते. त्यामुळे भूक लागणे कमी होऊन, वारंवार काही ना काही खात राहण्याचे प्रमाण कमी होते. परिणामी वजन घटण्यास मदत होते.

## आरोग्यासाठी लिंबाचे फायदे

**लिंबू** हे फळ आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत उपयोगी आहेच, पण त्याशिवाय त्वचेच्या सौंदर्यासाठी देखील याचा वापर करण्याची पद्धत फार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. लिंबाचा सुवास हा मन प्रफुल्लित करणारा आहे. किंबहुना मन उदास असताना लिंबाचा सुवास मनाला प्रसन्नता देणारा असल्याचे तज्ज्ञ म्हणतात. लिंबामध्ये जीवाणू प्रतिरोधक तत्त्वे आहेत. लिंबाचा रस हा केवळ त्वचेसाठी नाही, तर केसांच्या उत्तम आरोग्यासाठीही उपयुक्त आहे. लिंबाचा रस त्वचेवर लावल्याने त्यामुळे चेहऱ्यावरील काळे डाग, मुरुमे, पुटकुळ्या आणि इतर समस्या कमी होण्यास मदत होते. लिंबाच्या फोडी गुडघ्यांवर किंवा कोपरांवर चोळल्यास तेथील काळसरपणा आणि कोरडेपणा दूर होऊन तेथील त्वचा मुलायम होण्यास मदत होते. नखांवर आलेला पिवळेपणा हटवण्यासाठीही लिंबाचा रस उपयुक्त आहे. लिंबाचा रस संधिवात आणि पचनाशी निगडित समस्या दूर करण्याच्या उद्देशाने उपयुक्त आहे. तसेच ज्यांना किडनीशी निगडित विकार असतील, त्यांच्यासाठी लिंबाच्या रसाचे पाण्यामध्ये मिसळून



केलेले सेवन उपयुक्त ठरते. या रसाच्या नियमित सेवनाने मलेरिया आणि कॉलरासारख्या रोगांची प्रतिकारशक्ती शरीरामध्ये निर्माण होत असते. लिंबामध्ये 'क' जीवनसत्त्व मोठ्या प्रमाणावर असून, यामध्ये 'इ' आणि 'अ' जीवनसत्त्वे, तांबे, क्रोमियम आणि भरपूर प्रमाणात ॲंटी ऑक्सिडंट्स असतात. लिंबाच्या फोडी रात्री झोपताना झोपण्याच्या खोलीमध्ये ठेवल्याने खोलीतील हवा जंतुमुक्त होते, तसेच खोलीमध्ये लिंबाचा मन प्रसन्न करणारा सुवासही दरवळत राहतो. रात्री झोपण्यापूर्वी लिंबाच्या फोडी झोपण्याच्या खोलीमध्ये ठेवल्या गेल्यास सर्दी-पडसे किंवा एखादी ॲलर्जी लवकर बरी होण्यास मदत होते.

## अनेक गुणांचा खजिना : काकडी

जगामध्ये सर्वप्रथम ज्या भाज्या पेरल्या आणि उगवल्या गेल्या त्यामध्ये काकडी या फळभाजीचा समावेश आहे. काकडीची पैदास भारतामध्ये सर्वात आधी उत्तर भारतामध्ये सुरू झाली. वर्तमान काळामध्ये संपूर्ण जगामध्ये मोठ्या प्रमाणावर उगवल्या जाणाऱ्या भाज्यांमध्ये टोमॅटो, कांदे आणि फुलकोबी पाठोपाठ काकडीची पैदास सर्वात जास्त होत असते. अनेक जीवनसत्त्वे आणि क्षार यांनी परिपूर्ण असलेली ही फळभाजी आजकालच्या काळामध्ये 'सुपर फूड'च्या श्रेणीपर्यंत येऊन ठेपली आहे.



**काकडी** हा एक लो कॅलरी अन्नपदार्थ असून, शंभर ग्रॅम काकडीमध्ये केवळ पंधरा कॅलरीज आहेत. वजन कमी करण्याची इच्छा असणाऱ्यांनी काकडीचा समावेश आपल्या आहारामध्ये अवश्य करायला हवा. यामध्ये अ, बी१, बी६, क ही जीवनसत्त्वे असून, काकडी पोटॅशियमचीदेखील उत्तम स्रोत आहे. शंभर ग्रॅम काकडीमध्ये सुमारे १४७ ग्रॅम पोटॅशियम असते, त्यामुळे याच्या सेवनाने रक्तदाब नियंत्रित होण्यास मदत मिळते. हृदयाच्या स्वास्थ्यासाठी देखील काकडीचे सेवन करणे चांगले.

काकडीमध्ये ९५ टक्के पाणी असल्याने याच्या सेवनाने शरीरामध्ये पाण्याची कमतरता होत नाही. तसेच यामुळे शरीराचे तापमान देखील नियंत्रित राहण्यास मदत होते. काकडीमध्ये अनेक रोगोपचारक गुण आहेत. यामध्ये असलेले पॉलीफेनोल्स अनेक तऱ्हेच्या कर्करोगांपासून शरीराचा बचाव करण्यास सक्षम आहेत. काकडीमध्ये पाणी आणि फायबर मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे याच्या सेवनाने शरीरातील घातक पदार्थ बाहेर टाकले जाऊन शरीराची पचनक्रिया सुरळीत राहते. काकडीचा रस दररोज घेतल्याने गॅसेस, ॲसिडिटी, छातीत जळजळ अशा अपचनाशी निगडित तक्रारींना आळा बसतो. काकडी सिलीकाचे उत्तम स्रोत आहे. सिलीकामुळे शरीरातील कनेक्टिव्ह टिश्यू बळकट होतात. मधुमेहाच्या रुग्णांसाठी काकडीच्या रसाचे सेवन विशेष फायद्याचे आहे. काकडीमध्ये अँटी ऑक्सिडंट्स मोठ्या प्रमाणावर असून काकडी त्वचेकरिता देखील चांगली आहे. काकडीमधील ॲस्कॉर्बिक ॲसिड आणि 'क' जीवनसत्त्वामुळे शरीरामध्ये कोलाजेनचे निर्माण होऊन त्यामुळे त्वचा सुंदर 'ब' नितळ दिसू लागते. तसेच याच्या नियमित सेवनाने केसांचे आरोग्यदेखील चांगले राहते. काकडी विकत घेताना नेहमी गडद हिरव्या रंगाची काकडी निवडावी. सालांवर डाग असलेली, हाताला नरम लागणारी आणि जाडसर दिसणारी काकडी घेऊ नये. काकडी फ्रीजमध्ये स्टोअर करावी, मात्र कोणत्याही प्रकारची फळे काकडीजवळ ठेवू नयेत, अन्यथा काकड्या लवकर पिवळ्या पडतील व त्यांची गुणवत्तादेखील कमी होईल.

# मुंबईत ४६ अतिधोकादायक दरड प्रवण क्षेत्र

## ७४ धोकादायक क्षेत्र, घाटकोपर विभागातील संख्या अधिक

**अशी आहेत दरड प्रवण क्षेत्र**

बाबुलनाथ येथील लॉयलका कंपाऊंड, सायन विभागातील सलामती हिल, काळाचौकी येथील जिजामाता नगर, शिवडी येथील न्यू शिवाजी नगर आणि बरादेवी, वरळी येथील आनंद नगर आणि अचानक नगर, लोअर परळ भागातील पोचखानवाला हिल रोड, जोगेश्वरी पूर्व येथील श्रीपुत नगर, जोगेश्वरी पश्चिम येतील बंदिवली हिल, अंधेरी येथील गिल्बर्ट हिल, गोरेगाव येथील राजीव गांधी नगर, मालाड पूर्व येथील रहेजा टाऊनशिप, कोकणी पाडा, कांदिवली पूर्व येथील वडारपाडा, कुर्ला पश्चिम येथील असल्फा हिल, मिलिंद नगर, नेताजी नगर, शास्त्री नगर, कुर्ला पूर्व येथिल कसाई वाडा, रेशमिका इस्टेट आणि नागोबा टेम्पल, चेंबूर येथील न्यू भारत नगर, गौतम नगर, घाटकोपर पश्चिम येथील वर्षा नगर, गजानन आणि सुदर्शन सोसायटी, साईकृपा, सोमेश्वर आणि कालभैरव सोसायटी, पंचशील आणि त्रिलोक सोसायटी, सहारा सोसायटी, संजय गांधी नगर, जय श्रीराम सोसायटी, राम नगर, श्री समर्थ आणि शिवशक्ती सोसायटी, राहुल नगर, श्री गर्जना सोसायटी १ आणि २ राहुल नगर, सिद्धेश्वर मित्र मंडळ, जय मल्हार नगर, जय आंबे माता सोसायटी, गणेश नगर, खन्डोबा टेकडी, सोनिया गांधी आणि आझाद नगर हिल क्रमांक २, भांडुप येथील तंजीपाडा परिसरातील साई निकेतन आणि शांती निकेतन सोसायटी, नवनाथ चाळ, ताजीवाडी, नाडार चाळ पत्रकार कंपाउंड, हनुमान नगर खदान, हनुमान टेकडी येथील हनुमान नगर आणि अमरतारा मित्र मंडळ, रमाबाई आंबेडकर नगर, विक्रोळी येथील सूर्या नगर, पवई येथील इंदिरा नगर, दुर्गा देवी वेल्फेअर सोसायटी आणि नेव्ही कंपाउंड, मुलुंड येथील पंचशील नगर, हनुमान पाडा.

**■मुंबई(बातमी/लेख प्रीती दीपक नाईक) :** मुंबईत दरवर्षी पावसाळ्यादरम्यान धोकादायक आणि अतिधोकादायक इमारतींसोबतच टेकड्यांचा म्हणजेच दरड प्रवण क्षेत्राचा विषय ऐरणीवर येतो. मुंबईत एकूण २४९ धोकादायक दरड प्रवण क्षेत्र असल्याचे समोर आले आहे. मुंबई महानगरपालिकेने केलेल्या पाहणीनुसार, २४९ ठिकाणी दरड कोसळण्याची शक्यता असलेल्या ठिकाणांपैकी ७४ ठिकाणे धोकादायक आणि ४६ ठिकाणे अतिधोकादायक श्रेणीत असल्याचे पालिकेकडून घोषित करण्यात आले आहे. यामध्ये मुंबई शहरातील ६, पश्चिम उपनगरातील ७ आणि पूर्व उपनगरातील ३३ ठिकाणांचा समावेश आहे. तर घाटकोपर विभागातील दरड प्रवण क्षेत्रांचा अधिक समावेश आहे. मुंबईतील घाटकोपर येथील असल्फा व्हिलेज, शिव येथील अन्टॉप हिल, चेंबूर-वाशीनाका, विक्रोळी पार्कसाईट, भांडुप, चुनाभट्टी-कुत्यार्तील विस्तीर्ण कसाई वाडा, आदी ठिकाणच्या डोंगरानजीक हजारो झोपड्या आहेत. काही कच्च्या तर काही पक्क्या बांधकाम केलेल्या या झोपड्या एकमेकांना आधार देत अनेक वर्षांपासून वसल्या आहेत. या झोपड्यांमध्ये लाखोंच्या संख्येने लोकांनी संसार थाटले आहेत. असे असले तरी, दरवर्षी पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे डोंगर भागातील माती पोकळ होऊन भुस्कलन होणे, दरडी कोसळणे अशा घटना घडत असतात. मुंबई महापालिकेतर्फे या दरडप्रवण धोकादायक



ठिकाणांना नोटीस बजावली जाते. सदर ठिकाण धोक्याचे आहे, तातडीने स्थलांतरित करावे, अशी नोटीस पालिकेचे अधिकारी झोपड्यांवर चिकटवून जातात.

**पालिकेच्या नोटिशीकडे रहिवाशांचे दुर्लक्ष**

पावसाळ्यादरम्यान अशा घटना घडू शकतात. यासाठी पालिकेच्या वतीने एप्रिल मे महिन्याच्या सुरुवातीलाच या भागातील लोकांना नोटिसा बजावण्यात येतात. मात्र, येथील रहिवाश्यांकडे पर्यायी जागा नसल्याने येथील लोक जीव मुठीत घेऊन या ठिकाणी राहतात. दरम्यान एखादी दुर्घटना झाल्यास येथे जीवित आणि वित्त हानी होण्याची दाट शक्यता असते. परंतु, पालिका किंवा संबंधित यंत्रणेने दिलेल्या नोटिशीनुसार घर खाली केल्यास घराला कायमचे मुकावे लागेल, अशी भावना या ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांमध्ये असते. त्यामुळे येथे वास्तव्यास असलेलले लोक या नोटीसकडे दुर्लक्ष करत असल्याची माहिती पालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिली.

# रस्ते काँक्रिटीकरणाच्या कामाला गती

## ३४२.७४ किमी लांबीची कामे पूर्ण, ७७१ रस्त्यांचे १०० टक्के काँक्रिटीकरण




- एकूण २,१२१ रस्ते कामांचे नियोजन
- ६९८.४४ किलोमीटर लांबीच्यां रस्यांशास चा समावेश
- १,३८५ रस्त्यांची मिळून ३४२.७४ किलोमीटरची कामे पूर्ण
- पूर्ण झालेल्या कामांची टक्केवारी ४९.०७
- १८६ किमी लांबीचे ७७१ रस्ते९ एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत पूर्ण
- १५६.७४ किमी लांबीच्या ६१४ दुसऱ्या रस्त्याचे काम चौक ते चौक अथवा अर्ध्या रुंदीपर्यंत पूर्ण

**■मुंबई :** पावसाळ्यामध्ये मुंबईकरांचा प्रवास सुखकर होण्यासाठी पालिकेच्यावतीने रस्ते सिमेंट काँक्रिटीकरणाचा प्रकल्प हाती घेण्यात आला. या प्रकल्पांअंतर्गत ३१ मेपर्यंत एकूण १,३८५ रस्त्यांचे मिळून ३४२.७४ किलोमीटर लांबीचे काँक्रिटकरण पूर्ण करण्यात आले आहे. या अंतर्गत, ७७१ रस्त्यांचे एकूण १८६ किलोमीटर लांबीचे काम १०० टक्के पूर्णत्वास गेले आहे. तर, ६१४ रस्त्यांवर चौक ते चौक अथवा अर्ध्या रुंदीपर्यंत याप्रमाणे मिळून एकूण १५६.७४ किलोमीटर लांबीचे काँक्रिटीकरण पूर्ण करण्यात आले असून हे सर्व रस्ते वाहतुकीसाठी खुले करण्यात आल्याची माहिती पालिका प्रशासनाने दिली. यावेळी, रस्ते कामे पूर्ण करताना महानगरपालिकेचा जल अभियंता विभाग, पर्जन्य जलवाहिन्या विभाग, पाणीपुरवठा प्रकल्प, मलनिःसारण प्रचालन, मलनिःसारण प्रकल्प आदी विभाग आणि उपयोगिता सेवा वाहिन्यांशी संबंधित यंत्रणा जसे की - विद्युत कंपन्या, गॅस वितरण कंपन्या, दूरध्वनी कंपन्या यांच्यावसमवेत समन्वय ठेवण्यात आला. काँक्रिटीकरण पूर्ण झालेल्या रस्त्यांवर कोणत्याही संस्थेस खोदकाम, चर करायला मनाई करण्यात आली आहे. तसेच, महानगरपालिकेतर्फे खोदकामास परवानगी दिली जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. सद्यस्थितीत रस्ते कामाचा राडारोडा, बांधकाम साहित्य, रस्तारोधक हटविण्यात आले असून रस्ते संपूर्णतः वाहतुकीस खुले करण्यात आले आहेत. रस्ते लगतच्या पर्जन्य जलवाहिन्यादेखील स्वच्छ करण्यात आल्या आहेत. विभाग कार्यालयांकडून रस्त्यांवरील अधिकृत गतिरोधकांची यादी प्राप्त झाल्यानंतर गतिरोधकांची पुनर्बांधणी करण्यात येणार आहे, अशी माहिती पालिका प्रशासनाकडून देण्यात आली.

# बेकायदा बांधकामे पालिकेच्या आशीर्वादाने

## हायकोर्टाची टिप्पणी, दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईचे निर्देश

**■मुंबई :** ठाणे महापालिकेच्या हद्दीतील बेकायदा बांधकामे ही पालिका आणि सरकारी अधिकाऱ्यांच्या आशीवार्दानेच उभी राहिली आहेत, अशी टिप्पणी करताना उच्च न्यायालयाने पालिकेच्या कारभारावर ताशेरे ओढले. ठाणे पालिका आयुक्तांनी कायद्याच्या चौकटीत राहून संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करावी, त्यांच्या निलंबनाचे आदेश जारी करावेत, असे सक्त निर्देश न्या. गिरीश कुलकर्णी आणि न्या. आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने गुरुवारी सुनावणीवेळी दिले. बेकायदा बांधकामाविरोधात सुभद्रा टाकळे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. त्यावर गुरुवारी सुनावणी झाली.



**इतर पालिकांसाठी उदाहरण ठरेल**

गुरुवारच्या सुनावणीवेळी उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, ठाणे महापालिकेने मुंब्रा परिसरातील १७ अनधिकृत बांधकामांवर कारवाई सुरू केली आहे. त्यापैकी १० पूर्णपणे पाडण्यात आली आहेत. तसेच ग्रीन झोन आणि नो-डेव्हलपमेंट झोनमधील बेकायदेशीर बांधकामांवर कारवाई करण्यासाठी पालिकेची ९ पथके तयार करण्यात आल्याची माहिती खंडपीठाला दिली. याची दखल घेत खंडपीठाने ठाणे पालिका आणि राज्य सरकारच्या प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या संगनमताचा समाचार घेतला. ठाणे पॅटर्न महाराष्ट्रातील इतर सर्व महापालिकांसाठी एक उदाहरण ठरेल, असा टोलाही लगावत याचिकेची सुनावणी पुढील गुरुवारपर्यंत तहकूब केली.

# जव्हार तालुक्यात पुलावरून पाणी, अनेक गाव पाड्यांचा संपर्क तुटला

**■जव्हार :** सोमवारपासून संपूर्ण जव्हार तालुक्याला झोडपणाऱ्या पावसाने झाप रस्त्यावर असणाऱ्या पोंढीचा पाडा येथील कमी उंचीच्या पुलावरून पाणी वाहू लागल्याने या मार्गावर असणाऱ्या अनेक गाव पाड्यांचा संपर्क तुटला असून रहदारीला मोठ्या प्रमाणात अडथळा सुरू झाला आहे. पोंढीचा पाडा पुलाची उंची वाढावी म्हणून गेल्या पंचवीस वर्षांपासून निरनिराळ्या स्तरातून मागणी केली जात आहे.परंतु प्रशासन केवळ टोलवाटोलवीची उत्तरे देत तांत्रिक अडचणी सांगत असल्याची माहिती येथील महिलांनी सांगितले.



"पोंढीचा पाडा पुलाची उंची वाढावी म्हणून गेल्या २५ वर्षांपासून मागणी केली जात आहे. परंतु, सरकारी बाबू आणि लोकप्रतिनिधींची नकार घंटामुळे येथील जनता विकासापासून कोसो दूर राहिली आहे.पायाभूत सुविधेकरिता साधा रस्ता या भागात बनवता येत नाही?"

**-एकनाथ दरोडा, सरपंच, झाप**

या मार्गावर ५ ग्रामपंचायती,१ प्राथमिक आरोग्य केंद्र,८ पथके,२ आश्रम शाळा,३५ जिल्हा परिषद शाळांचे मार्ग बंद झाल्याने शिक्षणाचे तीन तेरा वाजले आहेत. गेल्या अनेक दशकांपासून ही समस्या असताना लोकप्रतिनिधी मूग गिळून गप्प आहेत.या आदिवासी जनतेला कोण न्याय देईल? डिजिटल इंडिया कागदावरच राहील की काय? अशी शंका या भागातील वृध्द नागरिक करीत आहेत.२३ जुलै २०२४ रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग जव्हार,तहसीलदार कार्यालय जव्हार,गटविकास अधिकारी पंचायत समिती, यांना पोंढीचा पाडा येथील पुलाच्या समस्येबाबत निवेदन दिले होते. मात्र त्यावर अजून काहीही उपाययोजना झाली नसल्याचे येथील वृद्ध नागरिक बोलतात. दरम्यान, जव्हार शहरात नाल्याची मान्सूनपूर्व सफाई झाली नसल्याने रस्त्यांना नदीचे स्वरूप आल्याचे पहावयास मिळत आहे.

# मुंबई विमानतळ परिसरातील ७ इमारतींचे पाडकाम



**■मुंबई :** मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या फनेल झोनमध्ये नियमांचे उल्लंघन करून बांधलेल्या ७ इमारतींवर पाडकाम कारवाई केल्याची माहिती बुधवारी मुंबई उपनगर जिल्ह्याधिकाऱ्यांनी उच्च न्यायालयात दिली. तसे प्रतिज्ञापत्र सादर करून बेकायदा बांधकामांसंदर्भात कारवाईबाबत दिलेल्या आदेशांचे काटेकोर पालन केल्याचा दावा जिल्हाधिकाऱ्यांनी केला आहे. मुंबई छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या फनेल झोनमध्ये उंचीची मयार्दा न पाळताच अनेक विकासकांनी टोलेजंग इमारती बांधल्या आहेत. या इमारतींमुळे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे, असा दावा करत वकील यशवंत शेणॉय यांनी न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

# राष्ट्रवादीचे महाराष्ट्र प्रदेश माजी सचिव नोवेल साळवे यांच्यावर हल्ला



**■कल्याण :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार पक्षाचे माजी महाराष्ट्र प्रदेश सचिव नोवेल साळवे यांच्यावर जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली आहे. १० जून रोजी संध्याकाळी उल्हासनगर कॅम्प ३,१७ सेक्शन येथून नोवेल साळवे जात असताना त्यांनी पाहिले की काही लोक मिळून वृद्ध सिंधी व्यक्तीला मारहाण करीत होते. साळवे यांनी मध्यस्थी करून तो भांडण सोडविण्याचे प्रयत्न केला असताना त्यातील एका गुंडप्रवृतीच्या व्यक्तीने मागून येऊन बांबूने साळवे यांच्यावर मागून हल्ला केला. ज्यात त्यांचा ब्लडप्रेशर शूटआउट झाला व त्यांना कार्डीएक अटॅक आला व ते जागीच कोसळले. घडलेल्या या सर्व घटनेची माहिती देण्यासाठी नोवेल साळवे यांचा मुलगा आणि पत्नी हे उल्हासनगर येथील सेंट्रल पोलीस स्टेशनच्या अधिकार्यांची भेट घेऊन सर्व घडलेली माहिती दिली.

नोवेल साळवे यांची जीव वाचवण्यासाठी धावपळ सुरू झाली. सर्वात पहिले उल्हासनगर येथील मीरा दवाखान्यात घेऊन जाण्यात आला तिथे उपचार देण्यासाठी मनाई करण्यात आली. तिथून मग साईबाबा प्लॅटिनम दवाखान्यात घेऊन जाण्यात आला तिथे त्यांना मनाई करण्यात आले. त्यानंतर साळवे यांना कल्याण येथील हॉली क्रॉस हॉस्पिटल मध्ये आणण्यात आले तिथे ही उपचार देण्यासाठी मनाई करण्यात आले. शेवटी नोवेल साळवे यांचे जीव वाचवायचे काम खडकपाडा येथील आयुष हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी केले. एका सामाजिक कार्यकर्त्यांवर अशी वेळ येणे ही आरोग्य क्षेत्रासाठी मोठी शोकांतिका आहे. नोवेल साळवे यांच्यावर प्राणघातक हल्ला करणारे उल्हासनगर हिराघाट येथील विनोद सिट कवरचे मालक आणि त्यांच्या गुंडांवर सेंट्रल पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी ठोस कारवाई करू न शकल्यामुळे सर्व राजकीय पक्ष, व्यापार्यांमध्ये नाराजी आहे.

# क्रिप्टो करन्सीसाठी अपहरण करणारे आणि खंडणी मागणारे अखेर पोलिसांच्या ताब्यात..

**■इंदिरानगर :** नाशिकमध्ये एक मोठी घटना घडली होती. हॉटेल मॅनेजरचे अपहरण झाले होते. १४ जून रोजी ही घटना घडली. अपहरणकर्त्यांनी क्रिप्टो करन्सीसाठी हे कृत्य केले. त्यांनी मॅनेजरच्या खात्यातून ५ लाख रुपये काढले. तसेच १० लाखांची खंडणी मागितली. पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. गुन्हे शाखा युनिट क्रमांक २ आणि इंदिरानगर पोलिसांनी ही कारवाई केली. त्यांनी ५ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. हुसैन हुमायुन पुनावाला (वय ३९) हे हॉटेल मॅनेजर आहेत. ते पाथर्डी गावचे रहिवासी आहेत. १४ जूनच्या रात्री ते राणेनगरकडे जात होते. तेव्हा त्यांचे अपहरण झाले.पोलिसांनी या घटनेची माहिती दिली आहे. ₹त्यांना चाकूचा धाक दाखवत जबरदस्तीने वाहनात बसवून एका निर्जन ठिकाणी नेण्यात आले,₹ नंतर सुनसान जागी नेले. तिथे त्यांच्या मोबाईलवरून ५



लाख रुपये ऑनलाईन ट्रान्सफर केले. या घटनेनंतर पोलिसांनी लगेच तपास सुरू केला. त्यांनी एफआयआर दाखल केली. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यामुळे आरोपींची माहिती मिळाली. पोलिसांनी साजिद हमीद शेख (वय ३२) याला अटक केली. तो शिंगाडा तलावाजवळ राहतो. त्याचे मूळ गाव इगतपुरी आहे. पोलिसांनी त्याला ठाण्यातील नौपाडा येथे सापळा रचून त्याला अटक केली. त्यानंतर प्रवीण देवकुळे नावाच्या दुसऱ्या संशयिताला ताब्यात घेतले. पोलिसांनी या प्रकरणात वापरलेली गाडी जप्त केली आहे. आरोपींचे मोबाईल फोनही जप्त केले आहेत. त्यांच्याकडून ५ लाख रुपये परत मिळवले आहेत. या प्रकरणाचा तपास अजून चालू आहे. आरोपींनी आणखी कोणाला फसवलं आहे का, हे पोलीस शोधत आहेत. गुन्हे शाखा युनिट क्रमांक २ आणि इंदिरानगर पोलिसांनी हे काम व्यवस्थित केले. त्यांनी आरोपींना अटक करून मोठा गुन्हा उघडकीस आणला आहे.पोलिसांनी आरोपींना पकडण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला. सीसीटीव्ही फुटेज आणि मोबाईल लोकेशनच्या मदतीने आरोपींना शोधले.

# काशीमिरा भागात हुक्का पार्लरवर कारवाई

## फ्लेवरचे २५ डब्बे,३४ कामगार,१६ पुरूष,५ महिला ताब्यात

**■भाईंदर :** काशीमिरा पोलिसांनी पेनकर पाडा भागात रात्रभर चालणाऱ्या सी मॅजिक देशी झ विदेशी बार अँड रेस्टॉरंट हुक्का पार्लरवर स्वतः वरिष्ठ पोलीस निरीक्षक आणि ७ अधिकारी आणि १० पोलीस अंमलदार यांनी धडक कारवाई करत प्रतिबंधीत तंबाखुमिश्रीत फ्लेवरचे २५ डब्बे, हुक्का पिण्यासाठीची साधन सामुग्री, ग्राहकांना हुक्का पुरविणारे ३४ कामगार, हुक्का पित असलेले पुरुष १६ ग्राहक, ५ महिला ग्राहक यांच्यावर कारवाई करत १२ हजार २२० रुपये रोख रक्कम जप्त करत गुन्हा दाखल केला आहे.

काशीमिरा पोलिसांनी माहिती मिळाली की, पेनकरपाडा भागातील सी-मॅजिक बार अँड रेस्टॉरंटमध्ये बेकायदा प्रतिबंधीत हुक्का पिण्यास पुरवला जातो. त्याठिकाणी बिनधास्तपणे हुक्का पार्लर सुरु असून त्याठिकाणी ग्राहकांना तंबाखू मिश्रीत प्रतिबंधीत हुक्का पुरविला जातो, अशी माहिती मिळाल्याने स्वतः वरिष्ठ पोलीस निरीक्षक आणि अधिनस्त ७ पोलीस अधिकारी आणि १० पोलीस अंमलदार यांची दोन पथके तयार करून छापा मारून कारवाई केली. त्या कारवाई दरम्यान सी मॅजीक देशी विदेशी बार ॲण्ड रेस्टॉरंट, पेणकरपाडा, मिरारोड पूर्व या ठिकाणी प्रतिबंधीत तंबाखूमिश्रीत फ्लेवरचे २५ डब्बे, हुक्का



पिण्यासाठीची साधन सामुग्री, ग्राहकांना हुक्का पुरविणारे ३४ कामगार, हुक्का पित असलेले पुरुष १६ ग्राहक, ५ महिला ग्राहक, आढळून आले. त्यांचे नाव, पत्ते घेवून विचारपूस करण्यात येऊन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कारवाईच्या ठिकाणची झडती घेतली असता त्यात वेगवेगळ्या कंपनीचे प्रतिबंधीत तंबाखूमिश्रीत फ्लेवरचे डबे, हुक्का पॉट, फिल्टर, चिमटे, एलईडी मॉनिटर, एक लॅपटॉप, २ स्वाईप कार्ड मशीन, रोख रक्कम १२ हजार २२० रुपये आणि इतर हुक्का पिण्यासाठीचे साहित्य मिळून आले. साधन-सामुग्री असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्यासोबत हुक्का चालक, कॅशियर, वेटर, ग्राहक, जागा मालक आणि तपासात निष्पन्न होणारे इतर यांच्या विरोधात काशिमिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ठाण्यात समृद्धी महामार्गावर जीप अन् ट्रकचा भीषण अपघात, २ ठार, तर ४ जखमी

**■कल्याण :** ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावर भीषण अपघात झाला, ज्यात परभणीहून दादरला निघालेल्या एका कुटुंबाच्या जीपने ट्रकला धडक दिल्याने दोघांचा जागीच मृत्यू झाला, तर चार जण गंभीर जखमी झाले. जखमींवर भिवंडीतील आयजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अब्दुल पाशा शेख (६५) आणि जाहिद सिद्दिकी (४०) अशी मृतांची नावे आहेत आणि त्यांच्या कुटुंबातील तीन सदस्य आणि जीप चालक इंगळे गंभीर जखमी झाले. ही घटना गुरुवारी पहाटे घडली. कल्याण तालुका पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, परभणी येथील अब्दुल शेख हे आपल्या मुलाला मुलगी पाहण्यासाठी दादर येथे जात होते. 'समृद्धी'वर आमने- कलकेवाडी दरम्यान त्यांच्या गाडीने समोर चालत असलेल्या ट्रकला मागून जोरदार धडक दिल्याने हा अपघात झाला. अपघातातून बचावलेल्या प्रवाशाला कोणतीही



या अपघातामुळे मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या महामार्गावर वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रवाशांनी महामार्गावर वाहन चालवताना अधिक काळजी घ्यावी आणि वेगावर नियंत्रण ठेवावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

दुखापत झाली नाही. चालक ज्ञानेश्वर इंगळे (२४) याच्यासह दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. भरधाव गाडी चालवून अपघाताला कारणीभूत ठरलेल्या चालकावर टिटवाळा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

कल्याण तालुका पोलिसांनी इंगळे यांच्या विरोधात भारतीय न्याय संहिताच्या संबंधित कलमांनुसार, स्वतःच्या आणि इतरांच्या जीवाला धोका निर्माण होईल अशा बेदरकारपणे गाडी चालवल्याबद्दल गुन्हा दाखल केला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांनी सांगितले की, "ते (इंगळे) बरे झाल्यानंतर त्यांच्यावर कारवाई केली जाईल."

मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावर यापूर्वीही अनेक अपघात झाले आहेत. वेगावर नियंत्रण न ठेवल्यामुळे आणि चालकांना डुलकी लागल्यामुळे हे अपघात होत असल्याचे दिसून येते. प्रशासनाने या महामार्गावर सुरक्षिततेच्या उपाययोजना अधिक कडक करण्याची गरज आहे, जेणेकरून भविष्यात अशा घटना टाळता येतील.

# नदीत दोघे सख्खे भाऊ बुडून बेपत्ता

**■भिवंडी :** पावसामुळे पाणी पातळी वाढलेल्या नदीपात्रात अक्षय पाण्यात बुडत असताना त्याला वाचविण्याचा प्रयत्न करण्यासाठी सागर गेला पण दोघेही पाण्यात बुडाले. या घटनेची माहिती पाहणाऱ्या एका मित्राने गावात दिल्यानंतर गावातील असंख्य तरुणांनी नदीपात्रात उतरून शोधण्याचा प्रयत्न केला गेला. त्यानंतर भिवंडी अग्निशामक व आपत्तीकालीन यंत्रणेला पाचारण करण्यात आले. तर घटनेची माहिती मिळताच नायब तहसीलदार आदेश म्हात्रे हे सुद्धा घटनास्थळी दाखल झाले. सायंकाळी साडे सात वाजता अंधार झाल्याने अग्निशामक दलाच्या जवानांनी शोध मोहीम थांबविली. संपूर्ण गावावर शोककळा पसरली असून सकाळी पुन्हा बेपत्ता युवकांचा शोध घेतला जाणार आहे.

# वर्ध्यात घरातून ४ लाखांचे दागिने चोरीला

## पोलिसांनी आरोपीला समोर उभं करताच कुटुंबीयांच्या पायाखालची जमीनच सरकली

**■नाशिक :** वर्धा-हिंगणघाट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पारधी बेड्यावरील एका घरात दरोडा पडला. अज्ञात चोरट्यांनी घरातील कपाटातून ४ लाख ५० हजार रुपये किंमचीचे दागिने चोरून नेले. घरच्यांना चोरीबाबत कळताच त्यांनी लगेचच पोलिसांत धाव घेतली. पोलिसांनीही गुन्हा दाखल करुन घेत शोध सुरू केला. मात्र शोध घेत असतानाच पोलिसांनी कुटुंबीयांची चौकशी केली. चौकशीदरम्यानच त्यांना एक संशय आला आणि चोर थेट पोलिसांच्या जाळ्यातच सापडला. चोरला पाहून कुटुंबीयांच्या पायाखालची जमिनच हादरली.

हिंगणघाट पोलिस ठाण्याच्या हद्दीतील तरोडा पारधी बेड्यावरील रहिवासी शोभिता चरण भोसले यांच्या घरात कोणी नसताना अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करुन घरातील कपाटातून ४ लाख ५० हजार रुपये किमतीचे ऐवज चोरुन नेल्याची तक्रार हिंगणघाट पोलिस ठाण्यात दिली होती. यासंबंधी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून डिबी पथकाने तरोडा पारधी



बेड्यावर जाऊन चोरट्याचा शोध सुरू केला यासंबंधी भोसले कुटूंबाची विचारपूसदेखील केली होती.

चौकशीदरम्यान शोभिता चरण भोसले यांची सून नेहा भोसले हिच्यावर पोलिसांना संशय आला. त्यानंतर तिची कसून चौकशी केली असता तिने चोरीची कबूल दिली. तिने चोरी केलेल्या वस्तू घराचे मागे असलेल्या दोनशे मीटर दूर असलेल्या पाटबंधारे विभागाच्या पडीक जागेत एका पन्नीमध्ये जमिनीत हे सगळं सोनं लपवून ठेवले होते. त्यामध्ये १० हजार रुपये नगदी रोख आणि ४ लाख ५५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने पोलिसांनी जप्त केले आहेत.

पारधी बेड्यावरील झालेल्या चोरीच्या घटनेत पोलिसांना चोर शोधण्याचे मोठे आव्हान असतांना पोलिसांनी तपास चक्र फिरवीत सुनेला अटक केली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अनुराग जैन, अप्पर पोलीस अधीक्षक डॉ सागर कवडे यांच्या मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी रोशन पंडित, पोलीस निरीक्षक देवेंद्र ठाकुर, यांच्या आदेशाने डि.बी. पथकाचे पोलिस उपनिरीक्षक सुनिल राम, प्रशांत ठोबरे, राजेश शेंडे, आशिष नेवारे, मंगेश वाघमारे, रोहीत साठे महिला पोलीस ज्युली मसराम यांनी केली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com